# बहुध्रुवीयतेकडून समाजवादाकडे

## जाहीरनामा

आंतरराष्ट्रीय जाहीरनामा समिती

**September 2011**

1948 साली भांडवलशाही व्यवस्थेच्या उगमस्थानी म्हणजेच युरोपमध्येच खातमा करण्याचे आवाहन क्रांतिकारकांना करताना कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्जल्स यांनी असे उद्‌गार काढले होते की, 'कामगार वर्गाला त्याच्या अस्तित्वाची सुरक्षितता देण्यास असमर्थ ठरलेला सत्ताधारी वर्ग सत्ताधारी वर्ग म्हणून राहण्यास नालायक ठरतो' आणि 'कामगार वर्गाने आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक (पोषक) अटी (सर्व) समाजावर प्रस्थापित कराव्यात'. जनउठावाच्या त्या वसंतऋतूपाठोपाठ पॅरिस कम्युनचा उठाव झाला आणि जगभर क्रांतिकारक आंदोलनांना उधाण आले. त्यावेळेपासून भांडवली सत्ताधाऱ्यांना कम्युनिझिमच्या भयाने कायमचे पछाडले आहे. कम्युनिझमच्या या 'संकटाला' पराभूत करु पाहणाऱ्या (भांडवलदारांच्या) प्रतिक्रांतीला शह देत सामाजिक संबंधांचे अधिकाधिक लोकशाहीकरण होत गेले.

दुसऱ्या महायुद्धानंतर, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या परिघावर आणि विकसनशील राष्ट्रांची निर्मिती होत असतानाच भांडवलशाही साम्राज्याच्या अगदी गाभ्यातच कामगार वर्गाने कल्याणकारी राज्य आणि नियंत्रित भांडवलशाहीसाठीचे लढे जिंकले होते. दरम्यान 1917 च्या रशियन क्रांतीपासून सुरुवात होऊन काही देशांनी समाजवादाची उभारणी करण्याकडे कूच केली. या देशांनी आपल्या गरजेनुरूप मोठ्याप्रमाणात उत्पादनवाढीला सुरुवात केली,कामाचे वाटप केले आणि समन्यायी वेतन देण्यास सुरुवात केली.या साठी पूरक ठरेल अशी परस्पर सहकार्याची व्यवस्था उभारली. त्यांना मिळालेले यश अपूर्ण होते. अनेक प्रकारचे मोठे प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहिले आणि अनेकदा मोठ्या अपयशांनाही तोंड द्यावे लागले. असे असले तरी भांडवलशाही, परात्मतेची भावना,साम्रज्यवादी वर्चस्व आणि अन्य सामाजिक अन्यायांपलीकडे जाणारे नवे जग निर्माण करण्यासाठी या देशांचे संघर्ष अविरतपणे सुरूच राहिले.

आज नवउदार भांडवलीव्यवस्था असो वा आवशेषात्मक अवस्थेत उरलेल्या सामाजिक लोकशाही व्यवस्था असलेले देश असोत, श्रीमंत देश असोत वा गरीब अशा सर्व देशातील भांडवली सत्ताधारीवर्गासाठी, वाढत जाणाऱ्या भांडवली अंतर्विरोधांची दशके उलटल्यावर, मार्क्स आणि एन्जल्सचे ते शब्द म्हणजे मृत्यूघंटेसारखे घुमत आहेत. भांडवली नवउदारवादी वित्तीयकरणाचे धोरण स्वीकारलेल्या भांडवलशाहीने उत्पादकतेची गतिमानता गमावली आहे आणि त्या व्यवस्थेला आता अनुत्पादक व्यवस्थेतील लुटारुंचे रुप प्राप्त झाले आहे. त्यामुळे अपरिमीत सार्वत्रिक दारिद्र्य निर्माण झाले असून, प्रचंड असमानतेमुळे धक्कादायक सामाजिक विषमता पसरली आहे, तीव्र राजकीय दडपणूक सुरू झाली आहे. अणुयुद्धाचा धोका तीव्र होत चालला आहे. जगभरात सुरू झालेले प्रचंड मानवी स्थलांतर आणि जागतिक तपमान वाढीमुळे निर्माण झालेली पर्यावरणीय आणीबाणी,प्रदूषण,वेगाने होणारा जैवविविधतेचा ऱ्हास या सर्वाच्या परिणामी ही पृथ्वी दिवसेंदिवस मानवी वास्तव्यासाठी अधिकाधिक अयोग्य ठरत आहे. या सर्वांपेक्षा धोकादायक बाब म्हणजे आज आपली पृथी एका महामारीच्या उद्रेकाला सामोरी जात आहे. त्या महामारीत भांडवली नफेखोरी आणि वाढत्या राजकीय दडपणुकीमुळे मोठ्या प्रमाणात माणसांचे बळी दिले जात आहेत. एकेकाळी रोझा लक्झेंबर्ग यांनी एक राजकीय भीती व्यक्त केली होती. ती फार प्रसिद्ध होती. त्या म्हणाल्या होत्या, की समाजवादाला पर्याय म्हणजे जंगलराजच असू शकते.आज मानवी प्रजाती आपले स्वतःचे आणि या पृथ्वी नावाच्या ग्रहाचे संपूर्ण निर्मूलन करण्याच्या टोकावर उभी आहे..

2010 च्या दशकात आजवर दडपून टाकलेल्या असंतोषाचा वारंवार स्फोट होऊ लागला आहे.या दशकाची सुरवात झाली ती ट्युनिशियातील निषेध आंदोलनांनी.त्या आंदोलनामुळे ‘अरब स्प्रिंग’ची सुरुवात झाली (अनेक अरब देशांत सरकार विरोधी जनआंदोलनांची साखळी सुरू झाली त्याचा उल्लेख “अरब स्प्रिंग” असा केला जातो.) आणि ती निषेधाची साख़ळी युरोपिय देशात लागू करण्यात आलेल्या आर्थिक काटकसरीच्या धोरणाविरोधातही पसरत गेली. शाळकरी मुलांची हवामान बदलाविरोधी निषेध आंदोलने,भारतीय मुस्लिम महिलांचा नागरिकत्व हक्काचा लढा , ब्लॅक लाईव्ज मॅटर, फ्रान्समधी ‘यलो व्हेस्टस’ आणि ढासळणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या आणि राजकीय दडपणुकीच्या विरुद्ध तुर्कस्तान पासून चीली पर्यंत आणि नायजेरिया पर्यंत झालेल्या विविध आंदोलनांपर्यंत ही आदोलनांची साखळी सुरूच राहिली. सन 2020 मध्ये,जगातील सर्वात मोठा भांडवलशाही देश असलेल्या भारतात ‘शेतीचे कार्पोरेट्करण’ (निगमीकरण) करण्याच्या

धोरणाविरुद्ध शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली वेढा (ठिय्या) आंदोलन करण्यात आले आणि भारतातील कामगारांनी भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा राष्ट्रीय संप केला होता.

आधीच तकलादू झालेल्या भांडवलशाहीने महामारीच्या संकटाला अत्यंत विस्कळीत आणि ढिसाळ प्रतिसाद दिला. त्यामुळे परिस्थिती आणखी चिघळत गेली. भांडवली सत्ताधाऱ्यांनी कितीही नाकारले, तरी भांडवली सत्ताधाऱ्यांच्या नफेखोरीच्या कुटील हेतूमुळे या जागतिक महामारीच्या काळात रोजीरोटी गमावल्यामुळे आणि महामारीसंबंधी चुकीच्या धोरणांमुळे बळी पडलेले लाखो लोक म्हणजे सामाजिक खून होते आणि त्यामुळेच प्रचंड मोठे, ऐतिहासिक असे आर्थिक आरिष्ट निर्माण झाले आहे.

सन 2020 च्या मध्याला प्राणघातक ठरलेल्या महामारीबाबतच्या धोरणाविरुद्ध जाब विचारण्यासाठी मोठ्या देशातील लाखो नागरिक रस्त्यावर उतरले. लाखो लोक ब्राझीलच्या रस्त्यावर उतरुन ब्राझील सरकारवर नरसंहाराचे आरोप करत होते. भारतातील नागरिकही आंदोलनाच्या पवित्र्यात होते. भांडवशाही विरुद्ध एक व्यापक असंतोषाची भावना वाढीला लागली होती.चिलीच्या नागरिकांनी तीव्र संघर्षातून जिंकलेल्या घटना-समितीच्या निवडणुकीनंतर घटना समितीची अध्यक्ष म्हणून एका स्थानिक मापुची महिलेची निवड केली. बोलिव्हियातील नागरिकांनी एका राज्य उठाव परतून लावला. तर पॅलेस्टाईनमधील नागरिकांनी इस्राईलचा आणखी एक हल्ला अभूतपूर्व एकजूट करत यशस्वीपणे परतून लावला.

भांडवली जग म्हणजे आजकाल जणू एक चकमक पेटी झाले आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या योग्यतेविषयी, आज कधी नव्हे एवढे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.या राजकीय व्यवस्था सत्तेवरील पकड गमावत चालल्या आहेत. तर या व्यवस्थांच्या मुख्य प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता कमालीची घसरली आहे.

भांडवली देशांच्या तुलनेत समाजवादी देशांनी महामारीला दिलेला प्रतिसाद नक्कीच चांगला होता. बऱ्याच प्रमाणात तो आदर्श म्हणता यईल असा होता.चीन, व्हिएतनाम आणि बहिष्कृत ठरवण्यात आलेला क्युबा या तिन्ही देशात महामारीमुळे झालेली मनुष्यहानी तुलनेने खूपच कमी होती.या देशांनी महामारीवरील वैद्यकीय उपचार करण्यासाठी अन्य देशांना मदतही केली.चीनने आपली अर्थव्यवस्था फार वेगाने पुन्हा पूर्वपदावर आणली. सन 2021 मध्ये चीन वगळता अन्य कोणत्याही देशाला आपल्या देशातील कष्ट्करी समाजाच्या आर्थिक, तंत्रवैज्ञानिक, पर्यावरणीय

आणि सामाजिक प्रगतीसाठी कोणतीही पावले उचलता आलेली नाहीत. चीनशिवाय अन्य समाजवादी देशांपैकी क्युबालाही या बाबतीत मोठे यश मिळाले आहे. आज पर्यंत चीनने राजकीय आणि औद्योगिक क्रांती, सरंजामदारीचे उच्चाटन आणि टोकाचे दारिद्र्याचे-निर्मूलन, पर्यावरणीय आणीबाणी यशस्वीपणे हाताळणे, पुनर्निर्मितीक्षम उर्जा निर्माण करणे,वनीकरण आणि अण्विक संमिलन (Atomic Diffusion)अशा अनेक बाबतीत निर्विवाद उत्तम यश मिळवले आहे.आता या यशांच्या मालिकेत आता चीनने कोरोना व्हायरस महामारी विरुद्ध उपाययोजना करण्यातही आपली क्षमता सिद्ध केली आहे. चीनने कोरोनाविरुद्धच्या लढाईत आंतरराष्ट्रीय पुढाकार घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने जुलै, 2021 मध्ये मोठ्या प्रमाणात आपल्या पक्षाची शताब्दी साजरी करणे स्वाभाविकच होते. अखिल मानवतेसाठी समाजवाद प्रस्थापित करण्याच्या संघर्षात,आपल्या देशाच्या स्थानिक परिस्थितीनुसार चीनचा कम्युनिस्ट पक्ष करत असलेली मदत आणि पक्षाकडून मिळणारी प्रेरणा, हे एक आदर्श उदाहरण ठरले आहे. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने समाजवाद प्रस्थापनेच्या संघर्षात आपले अढळस्थान निर्माण केले आहे यात शंका नाही.

आज समाजवादाचा संघर्ष एका धोक्याच्या वळणावर पोहचला आहे. विविध पातळीवर चीनने मिळवलेल्या यशाच्या तुलनेत जागतिक महामारीचे आरिष्ट हाताळण्यात जगातील महत्त्वाच्या साम्राज्यशाही देशांचे सर्वच क्षेत्रातील अपयश ठळकपणे पुढे आले आहे. आज हेच मोठे साम्राज्यशाही देश आता चीन बरोबरच्या या नव्या शीतयुद्धात अन्य साम्राज्यशाही देश आणि मागासलेल्या देशांचे नेतृत्व करण्याचा प्रयत्न करत आहेत. पूर्वी घडलेल्या शीतयुद्धाप्रमाणेच या नव्या शीतयुद्धातही, साम्राज्यशाही देशांचे मुख्य आक्रमण पॅलेस्टाईन पासून पेरू पर्यंत आणि व्हिएतनामपर्यंत सर्व देशातील जनतेच्या स्वायत्त विकासाच्या धोरणावर आहे. या आक्रमणासाठी जगातील सर्वात विघातक शस्त्रांचा वापर केला जात आहे. या आक्रमणासाठी मोठ्या जनसमुहाचा संहार करण्याची क्षमता असलेली रासायनिक,जैविक आणि अण्विक शस्त्रांचा, तसेच सायबरनेटिक तंत्राचा आधार घेतला जात आहे. आजपर्यंत जगाच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणात विघातक क्षमता असलेली शस्त्रे, जगातील बहुसंख्य जनता आणि समाजवादासाठी प्रयत्न करणाऱ्या जनसमुदायांविरुद्ध वापरण्यासाठी काही मोजक्या बेजबाबदार आणि उतावीळ सत्तधाऱ्यांच्या हातात एकवटली आहेत, अशी परिस्थिती याआधी कधीही निर्माण झाली नव्हती.

अशा अत्यंत धोकादायक आणि चिंताजनक परिस्थितीत आम्ही हा जाहीरनामा घोषित करत आहोत. हा जाहीरनामा जगातील सर्व खंडातील समाजवादी परंपरेतून आलेल्या महत्त्वाच्या प्रतिनिधींच्या विचारविनीमय आणि चर्चेतून तयार करण्यात आला आहे. या जाहीरनाम्यातील ऐतिहासिक आणि सैद्धांतिक मूल्यमापन आजच्या परिस्थितीत वर्गसंघर्ष आणि समाजवादाकडे जाणारे राष्ट्रीय लढ्यांना चालना देण्याच्या हेतूने मांडले गेले आहे.

**भांडवलशाही आणि समाजवादी व्यवस्थांची भू-राजकीय अर्थव्यवस्था**

भांडवलशाहीचे क्रांतीशी जवळचे नाते आहे. इतिहासात भांडवलशाहीने अनेक जनवादी क्रांत्याना तोंड दिले आहे आणि पचवल्या आहेत. सुरुवातीपासूनच म्हणजे सन 1917च्या आरंभापासून अशा क्रांत्यांनी भांडवलशाही व्यवस्थांना आव्हान दिले आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे, उदारमतवादी धारणांच्या अगदी विपरित अशी अत्यंत अनैसर्गिक अशा पद्धतीच्या सामाजिक उत्पादनाची पद्धत भांडवलशाही व्यवस्थेने स्वीकारली होती. उदारमतवाद्यांच्या संकल्पनांच्या विपरित ठरलेल्या भांडवली व्यवस्थेत ‘श्रमांचे उत्पादन प्रक्रियेपासून मुक्त श्रम म्हणून विलगीकरण केले जाते’, तसेच ‘[आपली] नैसर्गिक कार्यशाळा असलेल्या (शेत)जमिनीपासूनही मानवी श्रम विलग केले जातात. [ मूळ संदर्भ: Founded as it is on the ‘separation of free labour from the objective conditions of its realisation’,‘from the soil (our)natural workshop’ {Grundrisse chapter iv/v}]

भांडवलशाही आणि साम्राज्यशाही हे दोन्ही घटक एकत्रितपणे कार्यरत असतात ही वस्तुस्थिती थर्ड इंटरनॅशनल आणि बोल्शेव्हिक्स यांना नेमकी समजली होती.मात्र या अत्यंत साध्या वास्तवाचे आकलन अनेक समाजवाद्यांना होत नाही. भांडवलशाही आणि साम्राज्यशाही एकत्रितपणे कामगार वर्ग आणि वासाहतिक आणि अर्ध-वासाहातिक राष्ट्रांचे शोषण करत असतात. या दोन्ही घटकांना भांडवलशाहीच्या भू-राजकीय आणि राजकीय अर्थशास्त्र अशा दोन्ही क्षेत्रात वेगवेगळ्या देशात समाजवादासाठी सुरू असलेल्या वर्गसंघर्षांमार्फत विरोध होत आला आहे. एवढेच नाही तर भांडवलशाहीला विरोध करणाऱ्या प्रत्येक समतावादी जनसमुदयानेसुद्धा असा विरोध केला आहे. आजही भांडवलशाही आक्रमणांच्या तडाख्यातून बचावलेले स्थानिक जनसमूह  जमीन, पर्यावरण आणि आपल्या समाजांचे परंपरागत प्राचीन हक्कांसाठी भांडवलशाहीच्या विरोधात संघर्ष करत आहेत.

वाढत्या प्रमाणात संघटित होणारा भांडवलदार गट आणि कामगार वर्ग यांच्यातील वर्गसंघर्षामुळे भांडवलदारांना कामगार वर्गाच्या हितरक्षणासाठी काही कल्याणकारी सवलती मंजूर कराव्या लागल्या, तसेच भांडवलदार वर्गावर जमीन आणि सामाजिक हक्कांशी संबंधित काही प्रतिबंधात्मक नियम आणि कर आकारणे भाग पडले.

आंतरराष्ट्रीय पातळीवर असमतोल आणि संयुक्त विकास यातील द्वंद्वामुळे प्रभुत्वात असलेली शासने आपली आर्थिक सत्ता, राजकीय आणि लष्करी सामर्थ्याच्या आधारे, एकमेकांशी परस्पर स्पर्धेच्या माध्यमातून आपले वासाहातिक वर्चस्व टिकविण्याचा निष्फळ प्रयत्न करताना दिसतात. त्यांना विरोध करणाऱ्या देशांनी शासनसंरक्षित पद्धतीने आणि शासनाच्या नियंत्रणाखाली, आपल्या आर्थिक स्वायत्ततेचा आग्रह धरत, उत्पादन शक्तींचा विकास करण्याचा प्रयत्न केला. जागतिक बाजारपेठेचा विस्तार आणि वसाहतवादाला झालेल्या विरोधामुळे जगाच्या अनेक भागात अतिरिक्त अत्पादन क्षमता तयार झाली. जनवादी क्रांती झालेल्या देशातील राजकीय सत्ताधाऱ्यांनी खाजगी भांडवलाचे उच्चाटनकेले आणि आपल्या देशात आर्थिक विकासाच्या माध्यमातून वसाहतवादाला आव्हान दिले. वसाहतवादाला अशा पद्धतीने दिलेले आव्हान सर्वाधिक टिकाऊ ठरले. अशा प्रकारे वसाहतवादी सत्तांमधील आणि वसाहवादी सत्तांविरुद्ध झालेले संघर्ष ‘बहूअक्षीय’ किंवा ह्युगो चावेझ यांनी अचूक वर्णन करण्यासाठि वापरलेली संज्ञा म्हणजे ‘बहुध्रुविय’ -- असे होते. सत्ता केंद्रातील सत्तेची बहूविध केंद्रे आणि राष्ट्रीय भांडवलशाहीतील आणि समाजवादी व्यवस्थांतील विविध बहूध्रुविय सत्ता केंद्रे या संज्ञेतून व्यक्त होतात.

सुरवातीच्या काळातील अशी बहूध्रुवियता ब्रिटन आणि त्यादेशाचे जूने आणि नवे स्पर्धक - म्हणजे फ्रान्स,जर्मनी,अमेरिका आणि जपान यांच्यात ती स्पर्धा होती. ही स्पर्धा केवळ बाजारपेठेपुरती नव्हती,तर वसाहती आणि ‘आर्थिक कार्यक्षेत्रा’बाबतही होती. कारण, त्या काळात दुबळी शासनं आणि शासनविरहित प्रदेश ताब्यात घेण्याची या देशांना संधी होती.

या स्पर्धेमुळे पहिले महायुद्ध झाले आणि भांडवलशाही आणि साम्राज्यशाहीतील तीस वर्षीय (1914 ते 1945) आर्थिक आरिष्टाची सुरवात झाली. दोन महायुद्धांमुळे आणि महामंदीमुळे या देशांच्या पायालाच सुरुंग लागला.या दोन महायुद्धांच्या काळात झालेले वर्ग लढे आणि राष्ट्रीय लढ्यांमुळे फॅसिजमचा पराभव झाला आणि जगाला हदरवून टाकणाऱ्या - रशिया आणि चीनमध्ये

दोन क्रांत्या झाल्या. तसेच पाश्चिमात्य वासाहतिक सत्तेविरुद्ध बंड झाली. त्या आरिष्टांची रुपरेखा तपासणे नक्कीच उद्बोधक ठरेल.

***साम्राज्यशाहीतील आरिष्ट***

झारच्या सत्तेखालील रशिया हा साम्राज्यशाहीच्या साखळीतील कच्चा दुवा होता. त्या पार्श्वभूमीवर रशियातील क्रांती म्हणजे मानवतेचा समाजवादाकडे सुरू झालेला लॉग मार्च ठरला.भांडवलशाहीच्या जन्मस्थानाबाहेर झालेल्या क्रांतीसमोर सामाजिक न्याय प्रस्थापित करणे आणि उत्पादन शक्तींचा विकास करणे आणि अखंड सुरू असलेल्या साम्राज्यवादी आक्रमणांना तोंड देणे ही आव्हाने होती. रशियन क्रांती आणि गर्भावस्थेतील चीनमधील क्रांती म्हणजे जगभरातील भांडवलशाही आणि साम्राज्यशाहीविरुद्ध उभ्या ठाकलेल्या पुरोगामी शक्तींचे दोन डोळे म्हणून बघितले जात होते.या दोन क्रांत्यांमुळेच युरोप आणि अशियामधील फॅसिजमचा पराभव होऊ शकला.त्यासाठी युरोप आणि अशियातील सुमारे तीन आणि दोन कोटी लोकांचे बळी द्यावे लागले होते.

फॅसिजम विरोधी लढाईतील महत्त्वाचा साथीदार म्हणून चीनला मान्यता मिळाली आणि 1943 मध्ये चीनने जवळजवळ सर्व आंतरदेशीय असमान करार रद्द करत स्वत:ला स्वतंत्र केले.चीन 1945 साली स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाचा संस्थापक सदस्य झाला. त्यानंतर चार वर्षांनी माओच्या नेतृत्वाखाली चीनी कम्युनिस्टांनी नागरी युद्धात विजय मिळवला आणि त्या पाठोपाठ जपानचा पराभव झाला. मात्र अमेरिकेच्या विरोधामुळे चीनला 1971 पर्यंत संयुक्त राष्ट्रसंघ आणि सुरक्षा परिषदेच्या बाहेर रहावे लागले होते.

साम्राज्यशाहीच्या आरिष्टाच्या काळात वासाहातिक आणि अर्ध-वासाहातिक देशांनीही स्वातंत्र्य मिळवले. या देशांना आधी रशियाने आणि नंतर चीनने आणि पुढे अन्य समाजवादी देशांनी सातत्याने पाठिंबा दिला. याबाबतीत अमेरिकेची भूमिका मात्र कायम दुटप्पीपणाची राहिली होती. पाश्चिमत्यांचे वर्चस्व टिकून रहावे, म्हणून अमेरिकेने सोविएत रशियाला दहशत बसावी म्हणून हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्ब टाकले. तसेच पूर्वीच्या युरोपियन वसाहतींशी आर्थिक व्यवहार टिकून राहावेत यासाठी उत्सुक असलेल्या अमेरिकेने त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यांना काही प्रमाणात पाठिंबा दिला होता हे खरे. परंतु,याच अमेरिकेने तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या विरुद्ध पन्नासपेक्षा जास्तवेळा युद्ध पुकारली होती.अमेरिकेने अत्यंत महागडी शस्त्रास्त्रे वापरूनही तिसऱ्या जगातील जनतेची स्वातंत्र्यासाठी लढण्याची राजकीय इच्छाशक्ती त्यापेक्षा वरचढ ठरली

होती. चीनी स्वयंसेवकांच्या मदतीने लढाणाऱ्या कोरियातील लढाऊ जनता असेल किंवा हो चि मिन्ह यांच्या नेतृत्वाखाली लढणारी व्हिएतनामी जनता असो, अमेरिकेला हार पत्करावी लागली होती. अमेरिकेच्या लष्कराचे असे अपयश पुढे इराक,सिरिया आणि अत्यंत नाट्यपूर्ण घडामोडी ठरलेल्या आजच्या अफगाणिस्तानातही पाहायला मिळाल्या आहेत.

या अतिपक्व अशा भांडवली व्यवस्थांनी संपूर्ण जगाला तीस वर्षांच्या दीर्घकालीन आरिष्टाच्या खाईत ढकलले होते. मात्र, 1945 नंतर पुढील तीन दशके भांडवली व्यवस्थांनी एक प्रकारचे आर्थिक स्थैर्य प्राप्त केले होते. भांडवली व्यवस्थांचे हे जणू 'सुवर्ण युग' होते असे म्हणता यईल. भांडवलशाही व्यवस्थांना हे 'सुवर्ण युग' साध्य झाले ते कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील व्यवस्थांकडून 'आयात' केल्या गेलेल्या सामाजिक कल्याणकारी योजना, सार्वजनिक मालकी आणि नियोजन अशा धोरणात्मक संकल्पनाचा वापर केल्यामुळेच! तर जपान,दक्षिण कोरिया आणि तैवान या देशांनी कम्युनिस्ट नेतृत्वाखालील देशांमधील जमीन सुधारणा धोरणाची 'नक्कल' केली होती. या कल्याणकारी धोरणांमुळे भांडवली देशातील विकासाला चालना मिळाली,कामगार-कष्टकरी वर्गाची क्रयशक्ती वाढली (गमावलेल्या वासाहातिक बाजारपेठची भरपाई या वाढलेल्या क्रयशक्तीमुळे झाली) आणि त्यामुळे उत्पादन विकासासाठी संशोधन आणि विकासाला चालना देता आली. अमेरिकेने पाश्चिमात्य देशातील कामगार वर्ग आणि शेतकरी वर्गाला कम्युनिस्ट तत्वज्ञानाच्या 'लागणी'पासून विलग केले होते.त्यामुळे स्थितीवादी 'चमत्कार' ठरवलेली आर्थिक पुनर्विकासाची धोरणे अमेरिकेला सहन करावी लागली. इतकेच नाही त्यासाठी आर्थिक पाठबळ देणे अमेरिकेला भाग पडले होते.

कम्युनिस्ट व्यवस्थांबाबत आकर्षणाचे मुद्दे अनेक होते.कम्युनिस्ट देशांत जोमदार आणि हेवा वाटावा असा शाश्वत आर्थिक विकास, त्यासाठी वापरले गेलेले अभिनव तंत्रविज्ञान हे महत्त्वाचे आकर्षणाचे मुद्दे होते. सोविएट युनियनने 1949 साली प्रतिबंधात्मक अण्वस्त्र निर्माण केली,1957 साली स्फुटनिक हा कृत्रिम उपगृह अवकाशात सोडला आणि 1961 साली युरी गागारिन, या पहिल्या अंतरळारवीराला अवकाश यानाद्वारे पृथ्वीच्या कक्षेत सोडले. परिणामी द्वेषपूर्तीसाठी 'मानवाला' चंद्रावर उतरविण्याचा कार्यक्रम अमेरिकेला हाती घ्यावा लागला होता.

तिसऱ्या जगातील अनेक देश कम्युनिजमकडे वळले आणि तिसऱ्या जगातील अनेक अन्य देशांनी आपल्या राष्ट्रीय विकासासाठी पाश्चिमात्य 'विकास' पद्धतीपेक्षा सोविएत किंवा चीनचे

(नियोजनबद्ध) विकास प्रारूप स्वीकारले. अपेक्षेइतका विकास त्यांना साध्य करता आला नसला तरी त्या देशांनी  मोठ्या प्रमाणात यश मिळवले हे सत्य, नाकारता य्त नव्हते.

युद्धोत्तर जगाने आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेने निश्चितपणे डावे वळण घेतले होते. अमेरिकेने जरी जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील इंग्लंडच्या शैलीचा अंगिकार केला असला, तरी जग तोपर्यंत बहूधृवियतेकडे सरकले होते. अमेरिका पुरस्कृत शीतयुद्धाच्या दडपणाला न जुमानता अमेरिकेच्या अनेक स्पर्धक देशांनी शासन पुरस्कृत संमीश्र विकास प्रारुप, वेगवान उत्पादन आणि स्थैर्य देणारे समाजवादी प्रारुप स्वीकारले आणि तिसऱ्या जगातील देशांनी त्यांची स्वायत्तता प्राप्त केली.

संयुक्त राष्ट्र संघाच्या गाभ्यातील ब्रेटन वूडस इन्स्टिट्युशन्स ऑफ इंटरनॅशनल गव्हर्नन्स या संयुक्त राष्ट्र संघाच्या पुढाकारातील संस्थेने सदस्य राष्ट्रांना समानतेने वागविण्याचे धोरण, स्वायत्ततेचा अधिकार,अनाक्रमकता या धोरणांचा पुरस्कार केला. अमेरिकेला जगाच्या अर्थव्यवहारात डॉलर लादता आला असला तरी डॉलर-सोने परिवर्तनीयतेचे सूत्र मान्य करणे भाग पडले. त्याचे दडपण सहन करणे अमेरिकेला अवघड झाले.अमेरिकेला नॉर्थ अटलंटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (नॅटो) संघटित करणे शक्य झाले असले तरी त्याच्यावर अंकुश ठेवणारा वॉर्सा करार संघ स्वीकारणे भाग पडले.भांडवल नियंत्रण,नियोजन,आर्थिक आणि व्यापारी व्यवस्थापन आणि आर्थिक आणि चलन धोरण या सर्व बाबतीत पूर्ण रोजगार आणि विकास ही व्यापक पायाभूत धोरणे म्हणून स्वीकारावी लागल्यामुळे (एकूण जागतिक)भांडवल संचय राष्ट्रांच्या चौकटीत बंदिस्त झाला.

या व्यवस्थेत तिसऱ्या जगातील बहुतेक देशांचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे या देशांनी अनेक प्रभावी व्यवस्था,आंतरराष्ट्रीय संस्था आणि चळवळी उभ्या केल्या.बांडुंग परिषद, अलिप्ततावादाची चळवळ,ग्रुप 77+ चीन आणि व्यापार आणि विकास संयुक्त राष्ट्र संघ अशा संस्था आणि चळवळींद्वारे विकास,स्वायत्तता आणि दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या धोरणांना चालना दिली. शांततामय सहअस्तित्वासाठी - परस्पर स्वायत्ततेचा आदर आणि क्षेत्रीय एकात्मता,अनाक्रमकता, अन्य राष्ट्रांतर्गत मुद्द्यांबाबत हस्तक्षेप न करणे, समानता, परस्पर लाभ आणि शांततामय सहास्तित्व अशा पांच तत्त्वांना झाऊ एनलाय आणि जवाहरलाल नेहरुंनी सन 1954 मध्ये मान्यता दिली. यामुळे साम्राज्यशाही आणि भांडवलशाहीवर मोठ्या प्रमाणात वेसण घातली गेली.

प्रसिद्ध अशा चीन आणि रशियातील दुफळीमुळे डाव्या गटाला जागतिक पातळीवर काही प्रमाणात अटकाव झाला असला, तरी जगभरात डाव्या राजकारणाची समाजवादाकडे वाटचाल सुरूच राहिली.

मात्र भांडवल साम्राज्यवादी अर्थव्यवस्थांच्याच मुख्यत: नियंत्रणात राहिले. कामगारवर्ग़ाची उपभोग क्षमता वाढली आणि बाजारपेठेची मागणी वाढली, समाजवादाच्या दिशेने वाटचाल झाली आणि विकासाचे नवे टप्पे साध्य झाले. शासनाच्या मदतीने उत्पादन क्षमता विकसित झाली तरी दुसऱ्या बाजुला मागणीच्या तुलनेत उत्पादन अपरिहार्यपणे मोठ्या प्रमाणात वाढत गेले. एका बाजुला उत्पादकता अगदी टोकाला पोहचली आणि मोठ्याप्रमाणात शासनाचा पाठिंबा मिळाला असला तरी त्याच बरोबर पाश्चिमात्य देशातील मोठ्या प्रमाणातील संघटित कामगार वर्ग़  आणि तिसऱ्या जगांतील देशांनी अधिक वेतनमान आणि किंमतीची मागणी केली. परिणामी, साम्राज्यशाही भांडवलातून मिळणारा नफा ओरबाडून घेतला गेला.त्यामुळे भांडवल गुंतवणूक आणि वाढ दोन्ही मंदावली, त्यातून साम्राज्यशाही अर्थव्यवस्था आरिष्टात ढकलल्या गेल्या : या  दुसऱ्या आर्थिक मंदीचे संकट 1970 साली अमेरिकेच्या व्हिएतनाममधील जीवघेण्या पराभवाबरोबरच निर्माण झाले होते.

**नवउदारवाद : रामबाण उपाय वा वार्धक्याकडे जाणारी भांडवलशाही आहे?**

भांडवलशाही अर्थव्यवस्थांसमोर निवडीचे आव्हान होते : एक पर्याय होता, समाजवादाकडे जाणाऱ्या सुधारणा आणखी व्यापक करत न्यायच्या,सार्वजनिक मालकी आणि त्याला पूरक नव्या योजना आणायच्या आणि त्यासाठी विकसित होत जाणाऱ्या तिसऱ्या जगात आर्थिक गुंतवणूक करायची आणि परिणामी त्यांच्या वाढत जाणाऱ्या मागण्या स्वीकारायच्या; तर दुसरा पर्याय होता तो नवउदारवादी आर्थिक नीती स्वीकारत बँकांच्या माध्यमातून भांडवल मुक्त करायचे, भांडवल विनिमयावर लागू केलेले युद्धोत्तर आर्थिक निर्बंध उठवत देशातील आणि आंतरराष्ट्रीय भांडवल मुक्त करायचे.पहिला पर्याय कामगार वर्गाला आणि तिसऱ्या जगाला अनुकूल ठरणारा होता. तर दुसरा पर्याय भंडवलदार आणि त्यांच्या बगलबच्च्यांना लाभदायक ठरणारा आहे.

या पार्श्वभूमीवर भांडवलदारांनी विजय मिळवला. जगभरातील डावी चळवळ राजकीयदृष्ट्या आणि तात्विकदृष्ट्या दुर्बळ झाले होते. सुधारणावादी धोरणांबाबत मतभेद होते. पहिले महायुद्ध, सन 1917 पासून एका पाठोपाठ झालेल्या समाजवादी क्रांत्या, सतत पाठिमागे लागलेले शीतयुद्धाचे

दडपण, तसेच कल्याणकारी शासन व्यवस्था आणि सुधारित जीवनमानासाठी तयार होणाऱ्या आकांक्षा यांचे दडपण होते. या पार्श्वभूमीवर जगभरात प्रचंड प्रमाणात पसरलेल्या कामगार, स्त्रियांच्या आणि राष्ट्रीय चळवळी संघटित करण्यात डाव्या चळवळीला अपयश आले. जगभरातील या बहुसंख्य जनतेला पहिल्या पर्यायामुळे काही न गमावता पूर्ण लाभ होणार होता. तर दुसऱ्या पर्यायामुळे सर्व काही गमवावे लागणार होते, त्यात एक अर्थपूर्ण राजकीय व्यवस्थेचा पर्याय गमवावा लागणार होता. तसेच तिसऱ्या जगालाही या दुसऱ्या पर्यायापासून काही लाभ होणार होता. समाजवादी आणि क्रांतिकारक चळवळीने पुढे वाटचाल केली असली, तरी अफगाणिस्थान, दक्षिण येमेन, अंगोला आणि निकारगोवा इत्यादी देशात असे आढळून आले, की विकास आणि क्रांतिकारक प्रक्रिया सुरू झाली तरी साम्राज्यशाही आणि त्यांच्या हस्तकांमार्फत प्रचंड दडपण आणले गेले आणि क्रांतिकारक प्रक्रिया उलथून टाकणाऱ्या प्रतिक्रांती त्या देशात घडवण्यात आल्या. सोविएत रशियामध्येही अशाच प्रकारच्या घातक कारवायांनी कशी प्रतिक्रांती घडवण्यात आली, हे आता उघड होत आहे.

नवउदार आर्थिक धोरणाचा आरंभ झाला तोच कामगार वर्ग आणि त्यांनी मिळवलेल्या ऐतिहासिक हक्कांवर हल्ला करत. त्याच बरोबर व्याजदर महाप्रचंड वाढवण्यात आल्यामुळे तिसऱ्या जगातील देशांना एवढा मोठा धक्का बसला की या देशातील दोन दशकांचा विकास धुवून काढला गेला. पूर्वीच्या सोविएत युनियन आणि युरोपमधील समाजवादी देशांत भांडवलशाहीची पुनर्स्थापना करण्याच्या प्रयत्नांत तेथील कामगार वर्ग दारिद्र्यात ढकलला गेला.

एवढी उलथापालथ करूनही हे नवउदारवादी धोरण पूर्णपणे फसले.भांडवलशाही आणि साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांना गतिमान भांडवली विकासाला अजिबात चालना मिळू शकली नाही.हे धोरण अयशस्वी होणारच होते. नवउदार आर्थिक धोरण मक्तेदारी भांडवलशाहीच्या या टप्प्यावर भांडवलातून मिळणारा नफा (लाभ) टिकवून ठेवण्यासाठी आखण्यात आले होते.आक्रमक (आकांक्षा प्रेरित) कामगार वर्गापासून बचाव,समाजवादी चळवळींचे दडपण आणि स्वायत्त राष्ट्रीय विकास प्रारुप स्वीकारलेल्या देशांपासून आपले आर्थिक हितसंबंध बचावण्यासाठी बुद्धीपुरस्कर घेण्यात आलेले कपटी धोरण होते. त्यासाठी मुक्त अर्थव्यवस्था, स्थावर संपत्तीवरील मुक्त हक्क आणि मुक्त स्पर्धात्मक बाजारपेठ या धोरणांची मुक्तकंठाने स्तुती करण्यात आली. सुमारे एका शतकानंतर या नवउदार भांडवलदार वर्गाने आपले 1914 पूर्वीचे एकाधिकारशाहीवादी साम्राज्यवादी भांडवलशाहीचे स्वप्न पाहायला सुरवात केली होती.

मात्र इतिहासाचे चक्र कधीही उलटे फिरवता येत नाही. नवउदारवादाची वाटचाल अत्यंत असमतोल पद्धतीने झाली. सुरुवातीला या नवउदारमतवादी धोरणाची अगदी टोकाची अंमलबजावणी त्या आधीच उदार अर्थिक धोरणाच्या पुरस्कर्त्या अँगलो-अमेरिकन भांडवलशाही देशात झाली होती. मात्र नवउदार धोरणाला प्रत्येक टप्प्यावर आम जनतेचा विरोध सहन करावा लागला होती.

नवउदार आर्थिक धोरणांतर्गत राष्ट्रीय पातळीवर सरकारी सार्वजनिक मालकी सोडून देण्यात आली, सरकारी नियंत्रणे उठवण्यात आली आणि सामाजिक सुरक्षा काढून घेतली गेली.या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी कामगार संघटनांवर हल्ले केले गेले आणि कामगार वर्गातील अनेकांना बेकारीच्या खाईत ढकलण्यात आले, कामगारांचे वास्तविक वेतन गोठवण्यात आले, अन्यलाभ गोठवण्यात आले. शासनाच्या कल्याणकारी योजनांत काटछाट करण्यात आली, मालकवर्ग अधिक ताकदवान झाला आणि सामाजिक सेवा आक्रसत गेल्या.

आंतरराष्ट्रीय पातळीवर आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक बँक साम्राज्यशाही देशांचे हितरक्षक बेलिफ म्हणून काम करू लागले. धनकोंच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष करत तिसऱ्या जगातील देशांवर कर्जफेडीसाठी प्रचंड दबाव आणण्यात आला.1980 आणि 1990 च्या दशकात साम्रज्यवादी सत्ताधाऱ्यांनी निर्यातीला प्रचंड चालना दिली, तिसऱ्या जगातील देशांच्या बाजारपेठेत मोजक्या प्राथमिक वस्तू आणि दुय्यम दर्जाच्या तांत्रिक वस्तुंची भरमसाठ निर्यात केली गेली आणि किंमती वाढवत नेल्या. त्यामुळे या देशांचा स्वत:चा निर्यात महसूल आणि आमदनी घसरत गेली. दुसऱ्या बाजुला सरकारी नियंत्रण आक्रसत नेण्यासाठी दबाव आणण्यात आला आणि त्याच बरोबर त्या देशांच्या उत्पादन क्षमता विकासासाठी आवश्यक सरकारच्या माध्यमातून होणारा विकास रोखण्यात आला. त्यासाठी आवश्यक सुलभ परतावा करण्याजोग्या अल्प-व्याजाचा कर्ज पुरवठा कमी करण्यात आला. याच काळात साम्राज्यवादी भांडवलासाठी तिसऱ्या जगातील अनेक देशात मात्र स्थानिक नैसर्गिक संसाधने, संपत्ती आणि कामगार वर्गाचे श्रम सहजपणे उपलब्ध झाले होते. त्या देशांची स्वायत्तता नष्ट करण्यात आली. नागरिकांचे लोकशाही हक्क आणि स्वायत्त राष्ट्रीय विकासाचे हक्क नष्ट करण्यात आले.

मात्र मरणोन्मुख अवस्थेतील भांडवलशाहीने आपल्याला मिळालेल्या या राजकीय संधीचा दुरुपयोगच केला. त्यांना घसरत्या आर्थिक विकासाला आळा घालता आला नाही, उत्पादकता आणि आर्थिक गुंतवणूक वाढवता आली नाही. साम्राज्यवादी भांडवलदारांनी तिसऱ्या जगातील

देशात निर्माण केलेली ‘ऑफ शोअर’ उत्पादन केंद्र म्हणजे ‘अल्प-वेतनावर उत्पादन करण्याची सुलभ केंद्रे ठरली. या ठिकाणी उत्पादन करणाऱ्या उद्योगांनी आवश्यक माफक स्थानिक कर देण्यास आणि स्थानिक कामगारांना योग्य वेतन देण्यात केलेली कुचराई केली.तसेच तेथील उद्योगांना पुरवठा केल्या जाणाऱ्या वस्तुंच्या किंमती वाढीव नफा मिळवण्यासाठी चढ्या ठेवल्या. यामुळे मागणी घसरत गेली आणि विषमता वाढत गेली.

यापेक्षाही वाईट म्हणजे या साम्राज्यवादी देशांनी आपल्या देशांची उत्पादकता वाढवण्यासाठी भांडवल आणि आर्थिक गुंतवणूक केली नाही. तर या देशांनी अनुत्पादक आणि किंमतींच्या जुगारी पद्धतीच्या व्यवहारांच्या जीवघेण्या स्पर्धेवर आधारित आर्थिक उलाढालीं केल्या.अमेरिकेने आपल्या देशात अशा आर्थिक व्यवहारांना सुलभपणे वाव दिला.1971 साली सोन्याच्या किंमतीशी डॉलर संलग्न करणे भाग पडल्यापासून, अमेरिकेने आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारात डॉलर- वर्चस्व टिकेल आणि डॉलरची किंमत सतत उच्च राखण्याच्या प्रयत्नांना पद्धतशीरपणे पाठबळ दिले. कर्ज आणि मत्ता (Assets) यांचा फुगा एवढा वाढला की त्यात कामगार,छोटे व्यावसायिक, सरकारचा पैसा आणि करदात्यांचा पैसा मोठ्याप्रमाणात खेचला गेला.तर दुसऱ्या बाजुला एका लहानशा उच्चवर्गीय श्रीमंत लोकांची संपत्ती मात्र मोठ्याप्रमाणात वाढली. अमेरिकेच्या सरकारने हे आर्थिक संकटावरील उपाय म्हणून अनेकवेळा ऋणकोंना पोषक अशी धोरणे घेतली आणि वित्तीय संस्थांना अतिरिक्त निधी पुरवला.

या सर्वात माहिती आणि संपर्क तंत्रज्ञान (Information and Communication technology - ICT) हा घटक नकारात्मक ठरला. वास्तविक सोविएत युगात सायबरनेटिक्स (संदेश नियंत्रण शास्त्र) तंत्रज्ञानाच्या आधारे माहिती तंत्रज्ञानाच्या संभाव्य क्षमता लक्षात घेता लोकशाहीवादी समाजवादी अर्थव्यवस्था उभारण्यात नियोजनात हे तंत्रज्ञान मदतकारक ठरू शकते, हे प्रायोगिक तत्वावर सिद्ध झाले होते. नवउदार आर्थिक धोरणाच्या समर्थक भांडवलदारांनी या तंत्रज्ञानाचा वापर केला तो परदेशात (ऑफ्शोअर) केल्या जाणाऱ्या आपल्या उत्पादनावर दूरच्या ठिकाणाहून नियंत्रण ठेवण्यासाठी. त्यातून भांडवलाचे एकत्रीकरण आणि केंद्रीकरण करणे भांडवलदारांना सुलभ ठरले. तसेच स्थानिक देशांची आर्थिक लूट करणे,आर्थिक सट्टेबाजी करणे, जमिनी हडपणे आणि नैसर्गिक संसाधनांची लूट करणे यासाठी हे तंत्रज्ञान वापरले गेले. या तंत्रज्ञानाच्या आधारे कामगार कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे आणि आपल्या ग्राहकांशी व्यावसायिक डावपेच खेळणे, बाजारपेठेतील मागणी आणि त्यासंबंधी समस्या सोडवण्यापेक्षा त्यांना बगल देणे, बाजारात वास्तविक गरजेपेक्षा

अवाजवी मागणी निर्माण करणे अशा मुक्त बाजारपेठेतील स्पर्धात्मक डावपेचांसाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला. अशा भांडवलशाही व्यवस्थेमुळे माणसांचे स्वास्थ्य हरवले, उपजीविकेच्या कामांचा दर्जा आणि रोजगार दोन्हीमध्ये घट झाली. तसेच सामाजिक सेवा कमी होत गेल्या.

नवउदार भांडवलशाही व्यवस्थेमुळे विकासाची गती कमी झाली. त्याच प्रमाणे पर्यावरणीय आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. वायू प्रदुषणात प्रचंड वाढ,हवामान बदलांशी निगडीत धोका, जैव विविधतेचा ऱ्हास आणि पाळीव प्राण्यांवरील (Farmed Animals) अपरिमीत क्रौर्य या समस्या तीव्र बनत गेल्या आहेत. या आजच्या भांडवलशाहीने पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक घटक मानवी उपभोगासाठी मोफत उपलब्ध आहे असे; ठरवून टाकले आहे. सध्याची जागतिक महामारी म्हणजे वाढत्या प्रमाणात वन्यप्राणी अधिवास नष्ट करण्यामुळे होणाऱ्या प्राणीजन्य विषाणू संक्रमणामुळे होणाऱ्या आजारांच्या साथीचे ताजे उदाहरण म्हणावे लागेल.

या पर्यावरणीय प्रश्नांच्या मुळाशी असलेल्या शास्त्रीय कारणांबाबत तज्ज्ञांमध्ये एकमत आहे, की हे प्रश्न हाताळण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर एकात्मिक धोरण आणि कृती आवश्यक आहे. मात्र भांडवलशाही व्यवस्थेचा आग्रह नफेखोर आणि 'बाजारपेठीय उपाययोजना' करण्यावर असल्याने पर्यावरणीय प्रश्न अधिकाधिक जटील बनत आहेत.

नवउदारवादी भांडवलशाहीची (आर्थिक) वृद्धीबाबतची कामगीरी प्रत्येक दशकात घसरत गेली आहे. विशेषत: सन 2008 नंतर आर्थिक वृद्धीची गती आणखीनच मंदावत आहे आणि ती आता प्रसिद्ध महामंदीतील आर्थिक वृद्धीदरापेक्षाही कमी झाली आहे.सन 2010 च्या अखेरीस या विषयातील तज्ज्ञ निरीक्षकांनी असा अंदाज व्यक्त केला, की भांडवलशाहीच्या पूर्णत: पोकळ आणि निष्फळ उत्पादन व्यवस्था आणि अमेरिका आणि इंग्लंड्सारख्या देशातील नवउदारवाद अमर्थक राजकीय नेतृत्वामुळे भांडवलशाही मोठ्या आर्थिक आरिष्टाकडे वाटचाल करत आहे. म्हणूनच भांडवलशाही विरुद्ध जनतेमध्ये मोठा असंतोष पसरला आहे आणि लोक रस्त्यावर उतरून आपला निषेध व्यक्त करत आहेत. महामारीमुळे या आरिष्टाला चालना मिळाली असून या नवउदार भांडवली अर्थव्यवस्थांची धक्कादायक दिवाळखोरी आणि विकृती कधी नव्हे इतकी उघड झाली आहे.

अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करायचे असेल आणि पर्यावरणीय आणीबाणी तसेच महामारीमुळे निर्माण झालेले आरिष्ट सोडवायचे असेल, तर अनेक पातळीवर धोरणात्मक बदल करणे आवश्यक

आहे. त्यासाठी औद्योगिक धोरण, शासकीय गुंतवणूक, सामाजिक वितरण व्यवस्थेची पुनर्बांधणी, पर्यावरणीय नियोजन आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची संरचना या सर्व बाबतीत समाजवादी व्यवस्थेप्रमाणे आणि त्या प्रमाणात बदल करावे लागतील. तसेच या सर्व व्यवस्थांवरील आणि शासनावरील भांडवलदारांचे नियंत्रण संपुष्टात आणावे लागेल.

या दिशेने जाण्याचा मार्ग त्यांच्यासाठी समोर खुला आहे. नवउदार भांडवलशी व्यवस्थेविरुद्ध वांशिक वंचितीकरण, लिंगभेद आणि अन्य कारणांमुळे वचिंतीकरण सहन करणाऱ्या जनतेमधील तीव्र असंतोष आणि भ्रमनिरास समोर उघड दिसत आहे.

**डाव्यांनी गमावलेली संधी आणि लोकानुनय**

काही सन्माननीय अपवाद वगळता कामगार वर्गाचे मानले जाणारे ऐतिहासिक पक्ष आणि कामगार संघटना या लोकांच्या असंतोषाला संघटित करून त्याला आदोलनात रुपांतरित करण्यात अपयशी ठरले, हे मान्य करायला पाहिजे.

भांडवली देशातील कामगार संघटनांनी ऐतिहासिक काळापासून भांडवली बहुराष्ट्रीय कंपन्या आणि सर्व राष्ट्रांच्याही वर असणाऱ्या संस्थांबरोबर (Supranational) वर्गसमन्वयाची भूमिका स्वीकारली होती. त्याचा परिणाम असा झाला, की युरोपियन ट्रेड युनियन कॉन्फेडरेशन (ETUC) आणि इंटरनॅशनल ट्रेड युनियन कॉन्फेडरेशन(ITUC) या संघटनांनी भांडवलशाही विरुद्ध तयार झालेला कामगार वर्गातील असंतोष सौम्य करण्याचे काम केले. नवउदारवादी भांडवलशाहीने केलेल्या हल्ल्याच्या वेळी या कामगार संघटनांनी त्याविरुद्ध भूमिका घेण्याची आपली जबाबदारी पार पाडण्यात कुचराई केली. असंघटित कामगार वर्गाला अनिश्चततेच्या परिस्थितीत ढकलले. मात्र त्याचवेळी तळागाळात काम करणाऱ्या अनेक कामगार संघटना याच काळात तयार झाल्या. फॅसिजम विरोधी आणि वसाहतवाद विरोधी भूमिकेचा वारसा सांगणारी वर्ल्ड फेडरेशन ऑफ ट्रेड युनियनने (WFTU) आजही समाजवादी आणि साम्राज्यशाही विरोधी भूमिका घेऊन ठामपणे काम करत आहे. या फेडरेशनच्या नेतृत्वाखाली साम्राज्यवादाखाली असलेल्या 135 देशातील दोन कोटी कामगार संघटित झाले आहेत.

कामगारांचे ऐतिहासिक पक्ष मात्र फारसे काही करू शकले नाहीत. उजव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांनी 1970 च्या दशकात अधिक नवउदारवादी आर्थिक धोरण स्वीकारले होते, तेव्हा

अनेक डाव्या पक्षांनी त्यांच्याशी अनेकदा तीव्र संघर्ष केला होता. मात्र नंतर उजव्या पक्षांचीच धोरणे अनेक डाव्या पक्षांनी स्वीकारली. यामुळे डाव्या पक्षांची कामगार वर्गाबरोबर नाळ तुटली. पाश्चिमात्य आणि पूर्व युरोपियन देशात घडलेले असे बदल स्वच्छपणे दिसतात. तर तिसऱ्या जगातील काही देशातही असे घडले आहे.

या पक्षातील शिक्षित किंवा बुद्धिवादी नेत्यांनी पक्षाचे नेतृत्व केले. मोठ्या संख्येने असलेल्या कामगार वर्गांची छोट्या बुद्धिवादी नेत्यांबरोबर आघाडी झाली. मात्र अलीकडच्या दशकात या पक्षांमध्ये टोनी ब्लेअर आणि क्लिंटन यांच्यासारख्या राजकारण्यांची संख्या या बुद्धिवादी नेतृत्वात वाढत गेली. पक्षात अनेक वर्ष कार्यरत असलेल्या अशा नेत्यांनी पक्षाचा ताबा घेतला आणि 'जागतिकीकरणा'च्या गोंडस नावाखाली पक्षाला नवउदारवादाची दिशा दिली.

युद्धोत्तर कालखंडात भांडवलशाहीच्या विस्तारासाठी, सार्वजनिक आणि कॉर्पोरेट नोकरशाहीसाठी विश्वासार्ह नोकरशहांची आवश्यकता होती. त्यासाठी व्यावसायिक व्यवस्थापकांचा एक गट निर्माण करण्यात आला.नवउदारवादाच्या कालखंडात परदेशातील उत्पादन व्यवस्थेचे केंद्रीय पद्धतीने व्यवस्थापन,अभियांत्रिकी,डिझायनिंग,कायदेशीर बाबी हाताळणी,विपणन,जाहीरात व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन आणि अशा प्रकारच्या विविध कार्यांसाठी आवश्यक असलेला व्यावसायिक व्यवस्थापकांचा थर सतत वाढत गेला. या व्यावसायिक व्यवस्थापकांच्या गटाला व्यवस्थापनात सामान्य कामगारांपेक्षा खूप वरचे, उच्च अधिकाराचे स्थान देण्यात आले.या गटाला अनेक सुखसोयी दिल्या गेल्या. व्यावसायिक व्यवस्थापकांच्या या गटाकडे खासगी आणि सार्वजनिक संसाधनांचे नियंत्रणही सोपविण्यात आले.नवउअदारवादी राजकीय व्यवस्थेने अशा व्यावसायिक व्यवस्थापकांच्या गटातूनच राजकीय नेते आणि सरकारमधील नोकरशाह,कामगार संघटनांचे नेते आणि गैरसरकारी स्वयंसेवी संघटना (एनजीओ),तयार होतील अशी काळजी घेतली. या प्रक्रियेतून राजकीय पक्षांच्या सीमा ओलांडणाऱ्या व्यावसायिक आणि कौटुंबिक संबंधांचे जाळे निर्माण होत गेले. त्यामुळे नवउदारवादी धोरणाला सर्व राजकीय पक्षांची मान्यता आहे, असे चित्र उभे राहिले. असे भ्रामक चित्र उभे करण्यासाठी फोर्ड फाउंडेशनने 'वर्ल्ड सोशल फोरम' संघटित करण्यासाठी आर्थिक सहाय्य्य केले,टोनी ब्लेअरने युरोपियन युनियनमधील राजकीय पक्ष,युरोपियन युनियनवर आणि त्यातील सरकारच्या मदतीवर अवलंबून असलेल्या संस्थांना आर्थिक निधी देण्यासाठी खास धोरण तयार केले. अर्थात या धोरणाला नवउदार धोरणांची किनार होतीच.

आता राजकीय पक्षातील मतभेद केवळ मतदारांना आपल्याबाजूने संघटित कसे करावे या मुद्द्याभोवती शिल्लक राहिले होते. उजवे पक्ष स्वाभाविकपणे मध्यमवर्गीय सामाजिक पुराणमतवादाचा पुरस्कार करत राहिले, तर आता व्यावसायिक व्यवस्थापकीय गटाच्या ताब्यात असलेले पारंपरिक डावे पक्षांचे नेते त्यांना मिळणारे आर्थिक लाभ आणि सुखासीन जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर नवउदारवादासहित सामाजिक उदारमतवादाचा पुरस्कार करत आहेत.अशा अगदी कडव्या सामाजिक उदारमतवादी राजकीय भूमिकेचे व्यवहारातील स्वरुप म्हणजे वैयक्तिक संघर्षाची आंदोलने करणे असे असते. असे संघर्ष सहसा वंचित आणि दडपलेल्या समाज गटातील, त्यातल्यात्यात प्रतिष्ठित अशा समाज गटातील -- स्त्रिया, 'ठळकपणे' दिसणारे अल्पसंख्य,लैंगिक अल्पसंख्य, वांशिक अल्पसंख्य - अशा सामाजिक गटातील व्यक्तींचे संघर्ष असतात. अशा प्रकारचा सामाजिक उदारमतवाद मुख्यत: प्रसार माध्यमांत ठळक प्रसिद्धी मिळणाऱ्या 'सांस्कृतिक मुद्द्यांवरील' लढ्यांना महत्त्व देतो. परिणामी, व्यापक, मोठ्या संख्येने असलेल्या, दरिद्री, बेरोजगार आणि अल्पवेतनावर काम करणाऱ्या असंघटित कामगार वर्गाचे प्रश्न मात्र दुर्लक्षित राहतात. या नवउदार मुक्त अर्थव्यवस्थेत या परिघावरील कामगारांची परिस्थिती अजिबात सुधारली नाही. उलट ते आणखीनच दारिद्र्याचे जीवन जगत आहेत. किंबहुना याच कारणामुळे युरोपियन सोशल डेमोक्रॅट्स पक्षांनी आपला सामाजिक,राजकीय आधार गमावला आहे.

डाव्या पक्षातील अशा व्यावसायिक क्षमता असलेल्या नेत्यांचा कामाचा मुख्य भर बैठका, परिषदा, संमेलने भरवणे,प्रसारमाध्यमांतील चर्चांत सहभागी होणे,पत्रकार परिषदा आणि निवडणुकांचा प्रचार करणे यावर असतो.प्रत्यक्ष कामगार वर्गात, कारखान्यांत जाऊन आणि कामगार वस्त्यांत जाऊन कामगार-कष्टकऱ्यांना संघटित करणे,त्यांच्यात राजकीय जागृती करणे हे किचकट आणि कठीण काम ते दुय्यम ठरवतात. कामगार वर्ग कमी पगार, त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला मिळणारी कमी किंमत, बेरोजगारी, परात्मभाव आणि अत्यंत हालाखीचे जीवनमान यामुळे संत्रस्त असतात. त्यांना आपल्या हक्कांचे संरक्षण करणारा समाजवाद हवासा वाटत असतो. पन याचवेळी हा कामगार वर्ग काही एकसंध नसतो. कामगार वर्ग त्यांच्या वेतनमानातील फरकानुसार,कामाच्या कौशल्यातील फरकानुसार, लिंग आणि वंशभेद आणि अन्य सामाजिक भेदामुळे विभागलेला असतो.कामगार वर्ग उजव्या आणि डाव्या विचारसरणीच्या पक्षातही विभागला जातो. वैचारिक भिन्नतेमुळे कामगार वर्गाची दिशाभूल होऊ शकते. नवउदारवादी डाव्या-उजव्या पक्षांच्या विचारसरणीतील 'भ्रामक सांस्कृतिक युद्धात' म्हणजे वास्तवात प्रतिक्रियावादी आणि

पतिक्रांतिकारीवादी नवउदारवादी प्रस्थापित राजकीय व्यवस्थेबाबत कामगार गोंधळात पडतात. या राजकीय व्यवस्थेतर्फे अस्सल पुरोगामी आणि क्रांतिकारी राजकीय नेते आणि चळवळींबाबत संभ्रमात पडतात.

आजच्या प्रस्थापित व्यवस्थेत उजवे आणि डावे दोन्ही प्रकारच्या सत्ताधाऱ्यांची प्रतिमा 'लोकप्रिय' सरकार अशी रंगवली जाते. त्यामुळे नवउदारवादी व्यवस्थेच्या विरुद्ध असलेला कामगार वर्गाचा असंतोष रिचवून टाकता येतो. ट्रंप असो वा ब्रझीलचा बोल्सोनारो असो किंवा अति उजव्या विचारसरणींच्या मोदींचे राजकारण असो वा कॉर्बिन (इंग्लंड) यांचे राजकारण असो किंवा डावी राजकीय प्रतिमा असलेला व्हेनेझुआलाचा मडुरो हे सर्व सत्ताधारी आपली सत्ता राबवण्यासाठी सामाजात फूट पाडण्याचे तंत्र वापरतात, असा आरोप केला जातो. मात्र उजव्या आणि डाव्या सत्ताधाऱ्यांच्या तंत्र वापरण्याच्या पद्धतीत फरक आहे, उजवे सत्ताधारी नवउदारवादी धोरणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक विभागणीचा फायदा घेत सत्तेवर येतात. तर डावे नवउदारवादी विषमता नष्ट करण्यासाठी नवउदारवादी व्यवस्था बदलून उलट दिशेने नेण्याचे आश्वासन देत सत्ता मिळवतात. या प्रस्थापित व्यवस्थेतील समान (न्याय्य) धोरणाचा सर्वात वाईट भाग कोणता असेल तर त्यांच्या धोरणातील समातोल (न्याय्य) हाताळणीचा दावा अत्यंत फसवा असतो : या प्रस्थापित व्यवस्थांना ट्रंपसारखा सत्ताधारी चालतो, परंतु प्रामाणिकपणे पुरोगामी धोरणे घेणारा राजकारणी मात्र चालत नाही. अशा राजकारण्याला सत्तेच्या जवळपासही येऊ दिले जात नाही किंवा तो सत्तेवर आल्यास त्याची वेळीच शिकार केली जाते.

जनतेच्या अगदी *सामान्य* समस्यांची चर्चाही केली जात नाही. त्या समस्या सोडवणे तर दूर.आज तिसऱ्या जगातील भांडवलशाही देश असोत, कम्युनिस्ट राजवटीतून बाहेर पडलेले देश असोत, किंवा औद्योगिकीकरणापासून दूर गेलेले पाश्चिमात्य देश असोत - या सर्व ठिकाणची बहुसंख्य जनता या नवउदारवादी व्यवस्थेची विरोधक आहे. मात्र या प्रस्थापित व्यवस्था कोणत्याही प्रकारचा राजकीय विरोध प्रगट करण्याची अजिबात संधी देत नाही.

आर्थिक घसरणीमुळे मध्यमवर्गीयांची व्यक्तिगत कारकिर्द उंचावण्याचे मार्ग दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. त्यामुळे या वर्गातील शिक्षित तरुण आणि मध्यमवयीन व्यावसायिक प्रबंधकही आता अडचणीत सापडत आहेत.या परिस्थितीचे दुश्चिन्ह असे आहे, की पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यान जर्मनीतील पूर्वीचा 'मध्यममार्गी मध्यमवर्ग' जसा वेगाने अतिरेकी उजव्या

राजकीय कल्पनांकडे ओढला गेला होता, तसेच आताही घडत आहे. या नवउदारवादी व्यवस्थेला उत्स्फुर्त विरोध कारणारे कामगार कार्यकर्ते आणि त्यांच्या संघटना संकटात सापडत आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे फ्रान्समधील 'यलो व्हेस्ट्स' चळवळ ! या पार्श्वभूमीवर 1991 पासून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत निर्माण झालेल्या राजकीय आणि नैतिक भूमिकेतील पेच आणि कम्युनिस्ट नेत्यांनी केलेल्या विश्वासघातामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. कम्युनिस्ट नेत्यांनी कामगार वर्गात प्रत्यक्ष काम करण्यापेक्षा व्यावसायिक कौशल्यांचा वापर करत पक्षीय नोकरशाहीत उच्च पदे हस्तगत केली. प्रस्थापित व्यवस्थेत - वांशिक, वर्णविद्वेषी, धर्मांधतावादी मुद्द्यांवर काही भ्रामक 'एकजूटीच्या आघाड्या' उभ्या राहिल्या. अशा आघाड्यांमुळे लोकसंख्या विविध गटात विभागली जाते आणि त्याच व्यवस्थेत भरडले जाणारे माणसांचे गट एकमेकांचे कट्टर शत्रू म्हणून उभे राहतात. आपल्या दुर्दशेला जबाबदार असणारा आपला नेमका शत्रू कोण हे ओळखणे त्यांना अशक्य होऊन बसले.

परिणामी आज *डाव्या चळवळीने* वर्ग लढ्याचे तेतृत्व करण्याऐवजी *डाव्या चळवळीतच* वर्ग लढे सुरू झाले आहे.

मात्र आर्थिक आरिष्ट जसजसे अधिकाधिक तीव्र होत जात आहे तसतसे या नवउदारवादी भांडवलशाहीचे राजकीय व्यवस्थेवरील नियंत्रण सैल होत जात आहे. विशेषत: समाजवादी समाज व्यवस्थांची यशस्वी कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे येत आहे.त्या तुलनेत भांडवलशाही व्यवस्थेचा होणारा ऱ्हास आणि त्यामुळे मोजावी लागणारी भयंकर किंमत उघड होत आहे.

**नवउदारवाद आणि पाश्चिमात्यांची घसरगुंडी**

नवउदारवादी संकल्पना आणि धोरणांनी कामगार वर्ग,तिसऱ्या जगातील देश, सोविएत युनियन आणि पूर्व युरोपमधील समाजवादांवर सुरू केलेल्या धक्कादायक आक्रमणांचा जोर फार काळ टिकू शकला नाही. नवउदारवादाने वाजत गाजत आणलेल्या कल्पना आणि त्यांचे वास्तविक स्वरूप यातील तफावत दिवसेंदिवस वाढतच गेली.या नवउअदारवादाचे थॅचर-रेगन युगातील मूळ स्वरूप हळूहळू बदलत गेलेले दिसते. 1990 च्या दशकात त्याला 'जागतिकीकरण' असे नांव देण्यात

आले. तर 2000 साली याच नवउदारवादी धोरणांना ‘अमेरिकन साम्राज्य’ असे नाव दिले गेले तर पुढे 2010च्या दशकात ‘काटकसर’ आणि ‘साधेपणाचे’ धोरण असे गोंडस नाव दिले गेले.

पाश्चिमात्य भांडवली देश जेव्हा सोविएत युनियनच्या मढ्यावर आनंदोत्सव साजरा करत होते तेव्हा अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटचा घरगुती तत्वज्ञ फ्रान्सिस फुकुयामा याने जाहीर करुन टाकले की इतिहासाचा अंत झाला आहे ! अखील मानवतेने उदारमतवादी लोकशाही आणि भांडवलशाही हे आपले इच्छित उद्दिष्ट यशस्वीरित्या साध्य केले आहे. आता यापुढे मानवतेला साध्य करण्यासारखे नवे काहीही उद्दिष्ट शिल्लक नाही. या नव्या उदारवादी व्यवस्थेच्या सर्वव्यापी अवताराने अचंबित झालेल्या जगाची अपेक्षा होती, की आता संपूर्ण जगात एकध्रुविय व्यवस्था निर्माण होणार आणि जगात कायमस्वरुपी शांतता निर्माण होणार. पण इतिहासाच्या मनात काही वेगळेच होते.

**एकध्रुवियता ?**

जगात एकध्रुविय सत्ता केंद्रित रचना निर्माण न होता उलट बहुध्रुवियतेला मोठी चालना मिळाली. नवउदारवादाने पाश्चिमात्य जगाला अपूर्व अशा मंदगतीच्या आर्थिक वृद्धीत बंदिस्त करून टाकले. परिणामी जागतिक आर्थिक सत्तेचे गुरुत्वाकर्षण केंद्र अतिशय जलद गतीने वाढणाऱ्या चीनच्या समाजवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्थेकडे सरकू लागले. तर भारत,ब्राझील आणि रशिया सारख्या विकसनशील भांडवलशाही देशांनी मुक्त बाजारपेठीय आर्थिक-मुलततत्ववादी मार्गावरून आपापल्या अर्थव्यवस्था मागे ओढल्या.

सन 2010च्या दशकात या देशांनी आयएमएफ आणि जागतिक बँकांसहित अन्य वित्तीय संस्थांच्या कारभारात सुधारणा करण्यात यावी अशी मागणी केली. ही मागणी जेव्हा पाश्चिमात्य देशांनी अमान्य केली तेव्हा त्यांनी, विशेषत: चीनने नवी वित्तीय व्यवस्था सुरू केली.यात अशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक, दि शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन, दि न्यू डेव्हलपमेंट बँक आणि बोलिवइयन अलायन्स फ़ॉर पिपल्स ऑफ अमेरिका या संस्थांचा समावेश आहे.चीन आणि रशिया यांनी युरेशिन एकात्मिकता घडवून आणली.चीनच्या वाढत्या आर्थिक केंद्राचे हे आकर्षण इतके वाढत गेले की आज जगातील दोन तृतीयांश देश अमेरिकेपेक्षा चीन बरोबर अधिक व्यापार करतात. चीनने सुरू केलेला ‘बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह’ हा पायाभूत विकास प्रकल्प आणि रशियाने आपल्या लष्करी कौशल्यात केलेली प्रचंड वाढ यामुळे त्यांच्या आसपासच्या देशांना

लष्करी आणि आर्थिक संरक्षण पुरवण्याची त्यांची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणजे आर्थिक व्यवहारांचा हा युरेशियन (युरोप आणि अशिया) अक्ष सक्रिय झाला आहे. जगातील सुमारे एक तृतियांश नागरिक आणि जवळजवळ अर्ध्यापेक्षा अधिक प्रदेश या व्यवहाराच्या प्रभावाखाली आला आहे. या नव्या रचनेमुळे पूर्वी चीन आणि सोविएत युनियनमधील दुफळीमुळे साम्राज्यवाद विरोधी संघर्षाच्या काळात तयार झालेल्या फाटाफूटीच्या दोषावर मात होऊ शकली आहे.

आता अफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेनेही पाश्चिमात्य वर्चस्वाविरुद्ध आपले हक्क शाबित करण्यास सुरुवात केली आहे.लॅटिन अमेरिकेतील ‘गुलाबी लाट’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या डावीकडे झुकलेल्या राजवटी, अमेरिकेने घातक दडपण आणले तरी आता अमेरिकेला जुमानत नाहीत. लिबिया सारख्या काही ठिकाणी माघार झाली असली तरी राष्ट्रीय आणि डाव्या चळवळी जोर धरत आहेत.पूर्वीच्या फ्रेंच अफ्रिकन वसाहतींमध्येही नवउदारवादी सी एफ ए फ्रॅन्क विरोधी जनचळवळी उभ्या राहत आहेत. सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या सेंट्रल अफ्रिकन रिपब्लिक या फ्रेन्चांच्या कब्जात असलेल्या सात्ताधाऱ्यांना तेथील जनतेने विरोध करत रशिया आणि रवांडाच्या सैन्याच्या मदतीने स्थानिक निवडणुकाही पार पाडल्या. साऊदर्न अफ्रिकन डेव्हलपमेंट कम्युनिटी या अंतरराष्ट्रीय संघटनेच्या सदस्य देशांनी (मोझांबिक,मालावी,लेसोथो,झिंबाब्वे) ब्रिटिश सरकारच्या नेतृत्वाखालील राजवटीमार्फत झिंबाब्वेमध्ये घडवले जात असलेल्या बदलांना आपला विरोध दर्शवला आहे.तर मोझांबिकचे अनेक शेजारी देश मोझांबिकच्या उत्तर भागात आयएसआयएस प्रभावाखालील उठाव मोडून काढण्यास मदत करत आहेत.

आजच्या घडीला अफ्रिका आणि लॅटिन अमेरिका आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या अधिक स्वतंत्र आहेत. ते पॅन अफ्रिकनवादी आणि पॅन लॅटिन अमेरिकनवादी भूमिकांचे पुनरुज्जिवन करू पाहात आहेत. या विचारसरणींच्या आधारे लॅटिन अमेरिका आणि अफ्रिकेतील पूर्वी कित्येक पिढ्यातील स्त्री पुरुषांनी क्रांतिकारक संघर्ष केले होते. क्रांतीची ती बीजे अजूनही जिवंत आहेत.

**शांततेचे काय झाले ?**

नवउदारवादी धोरणामुळे जगात शांतता प्रस्थापित होणार आहे असे सांगितले जात होते.पण प्रत्यक्षात काय घडले? अमेरिकेने आपल्या डळमळीत झालेल्या अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी लष्करी आक्रमकतेचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे युद्धांचे पेव फुटले. या युद्धांना विविध नावे

देण्यात आली. ‘मानवी हक्कांसाठी युद्ध’, ‘लोकशाहीसाठी युद्ध’, ‘सरकार अकार्यक्षम असलेल्या देशातील ‘नागरिकांच्या रक्षणासाठी युद्ध’ अशा घोषणा देत अनेक युद्ध छेडली गेली. त्या,त्या देशात संमिश्र सरकार तयार केली गेली. युद्ध छेडण्यात आलेल्या देशात लोकशाही व्यवस्था निर्माण न करता या गरीब देशांचे दरवाजे साम्राज्यशाही पद्धतीने भयंकर आर्थिक शोषण करण्यासाठी उघडण्यात आले. या देशांत नवउदार भांडवलशाही व्यवस्था निर्माण करण्यात आली. गरज पडेल तिथे नागरिकांचे सुरक्षित जगण्याचे,स्वायत्त विकासाचे मुलभूत लोकशाही हक्क पायदळी तुडवत त्यांच्यावर गुलामी लादण्यात आली. अमेरिकेच्या वर्चस्वाला विरोध करणाऱ्या सिरिया, क्युबा, व्हेनेझुएला आणि येमेन अशा देशांचा औषधे,तेल आणि अन्न पुरवठा बंद करून या देशांना शिक्षा करण्यात आली.

अशा युद्धांची साखळी अशीच चालू राहणार आहे. वित्तीय व्यापारीकरणावर भर देणारे (financialised) आणि औद्योगिककरण दुय्यम ठरवणारे (deinduastrialised) पाश्चीमात्य देश आजही शस्त्रास्त्रे निर्मितीचे जगातील मुख्य केंद्र आहेत. त्यामुळे युद्ध करत राहणे, हा त्यांच्या औद्योगिक धोरणाचा अविभाज्य भाग आहे. युद्ध करुन ती जिंकणे आणि त्या देशात योग्य सामाजिक पुनर्निर्मिती करण्यापेक्षा शस्त्रांची ‘विध्वंस क्षमता’ तपासणे, हा युद्धांमागचा मुख्य उद्देश असतो. युद्धात वापरलेल्या शस्त्रास्त्रांचा अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत व्यापार वाढवण्यासाठी या शस्त्रांची जाहिरात करता येते.अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चिमात्य देशांनी संरक्षित केलेल्या इस्रायल सारख्या देशांनी कधीच युद्ध जिंकलेली नाहीत. उरल्यात त्या केवळ त्यांनी युद्धात घडवलेल्या विध्वंसाच्या खूणा!

वाढती लष्करशाही, दडपणूक, दारिद्र्य आणि पर्यावरणीय ऱ्हास यामुळे जगभरात मानवी स्थलांतराच्या लाटा निर्माण होतात. या स्थलांतरितांना पाश्चिमात्य देशांच्या सीमांवर आडवले जाते,त्यांच्यावर दडपशाही केली जाते आणि आसपासच्या देशात ढकलले जाते.बर्लिनची भिंत पडली असेलही, पण तशाच प्रकारच्या वेगळ्या शेकडो भिंती आज देशादेशात उभ्या राहिल्या आहेत. लोकांचे उच्चार स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या, सत्य सांगण्यावर बंधने घालणाऱ्या, घातक गोष्टींविरुद्ध आवाज उठवण्यावर बंदी घालणाऱ्या, अन्याय-अत्याचाराविरुद्ध आंदोलन करण्यावर बंदी घालणाऱ्या या ‘भिंती’ आहेत. मानवी हक्कांचे उल्लंघन ही केवळ तिसऱ्या जगातील देशातच नाही, तर मिनिओपोलिस आणि पॅरिस सारख्या पाश्चिमात्य देशातही आम बात झाली आहे. शातंता आणि विकास, सामाजिक न्याय आणि सामाजिक हक्क मिळाल्याशिवाय मानवी हक्क

प्रत्यक्षात कसे येऊ शकतात ? कोणत्याही देशांचे सरकार स्वायत्तता असल्याशिवाय आपल्या नागरिकांना मानवी हाक्क आणि प्रतिष्ठा कसे देऊ शकेल? त्यासाठी जगाची बहुध्रुवियता मान्य करायलाच लागते. सर्व देशांना दूषित पूर्वग्रहाविना संपूर्ण आदर दिला जायला हवा. आज चीन किंवा क्युबा किंवा निकारगोआ हे देश आपल्या देशातील नागरिकांना मूलभूत मानवी हक्क देण्यासाठी प्रयत्नशील आहेत, मात्र त्या देशातील शासन व्यवस्थांना बदनामीकारक शिक्के मारण्यात आले आहेत.

भांडवलशाहीने आपले मानवता विरोधी अपराधांचे सत्र सुरूच ठेवले आहे. तसेच कम्युनिस्ट समाजव्यवस्था अस्तित्वात येऊ नये म्हणून समाजात कम्युनिस्ट तत्वज्ञान आणि कम्युनिस्टांविरुद्ध सतत टोकाचा विखारी प्रचार सुरू ठेवला आहे. समाजवादी व्यवस्थेत चांगल्या दर्जाचे जीवनमान मिळेल आणि मानवी हक्क प्राप्त होतील - मुक्त उच्चार स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य किंवा संघटना स्वातंत्र्य मिळेल, सांस्कृतिक स्वातंत्र्य आणि निरोगी जीवनमान मिळेल -- याचे भान लोकांना येऊ नये म्हणून व्यापक प्रचार यंत्रणा राबवली जात आहे.

जगात महामारी सुरू होण्यापूर्वी पश्चिमी अर्थव्यवस्था, सामाजिक,राजकीय परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय राजकारण अशा अत्यंत कावेबाज आणि धोकादायक अवस्थेला पोहोचले होते.

**महामारीची जागतिक आपत्ती म्हणजे भांडवलशाही आणि समाजवादाची ‘स्ट्रेस टेस्ट’**

महामारीच्या गंभीर संकटाची पूर्वसूचना मिळूनही गरीब आणि श्रीमंत भांडवली देश महामारीला तोंड देण्यात अपयशी ठरले. सुरवातीला बराच काळ या देशांतील सरकारांनी आपल्या देशात कोविड संसर्ग स्थिती फारशी गंभीर नाही, अशीच भूमिका घेतली. त्या देशातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, गेली कित्येक दशके, अपुऱ्या आर्थिक पाठबळामुळे आधीच अत्यंत कमकुवत झाल्या होत्या. या व्यवस्था महामारीच्या दबावामुळे पूर्णपणे कोलमडून पडल्या. कोविड असो वा नसो एकूणच या व्यवस्थांना आर्थिक ताकद देऊन त्यांचा दर्जा उंचावणे आत्यावश्यक आहे. भांडवली देशातील सरकार असा दावा करतात, की ते माणसांचे जीव वाचवणे आणि लोकांचे रोजगार टिकवणे या दोन आघाड्यांवर काम केल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत मेटाकुटीला आली होती. मात्र वास्तव फार वेगळे होते. या महामारीच्या काळात भांडवली व्यवस्था या परिस्थितीतही आपली नफेखोरी करत आम लोकांच्या जीवाशी खेळत होती.

महामारीच्या काळात अमेरिकेतील सरकारी प्रशासन महामारीमुळे वित्तीय बाजारपेठेत आलेल्या मरगळीवर उपाययोजना करण्यात दंग होते. तर काही नवउदार आर्थिक धोरण स्वीकारलेले भांडवली देश कोरोना मृतांची संख्या वाढत असूनही त्याकडे दुर्लक्ष करत, 'आपल्या देशात अधिक संसर्गामुळे नागरिकांमध्ये कोरोनाविरुद्ध 'सामूहिक प्रतिकारशक्ती' तयार झाली आहे असा प्रचार करत राहिले. लोकांमध्ये सरकारच्या नाकर्तेपणामुळे मोठा असंतोष तयार झाल्यावर या देशातील सरकारांनी कोरोना उपचारांसाठी थोडीफार हलचाल आणि 'उपाययोजना' केली एवढेच. ही उपाययोजना म्हणजे भांडवली नफेखोरीला अडथळा ठरणाऱ्या 'लॉकडाऊन' चा कमीतकमी वापर करत रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या कमीतकमी कशी राहील याची खबरदारी घेतली. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कशी कमकुवत आहे, हे उघड होऊ नये आणि ती मोडून पडू नये यासाठी रुग्णांना रुग्णालयापर्यंत येऊच द्यायचे नाही, असे धोरण घेतले गेले.

नउदार आर्थिक नीती स्वीकारलेल्या देशांनी खूप पूर्वीपासून वैद्यकीय व्यवस्थेचे कार्पोरेटीकरणाचे धोरण स्वीकारले आहे.औषधे ही एक क्रयवस्तू ठरवली आहे. या व्यवस्थेने सरकारी आरोग्य व्यवस्था किंवा वैद्यकीय सेवेतील आरोग्य चाचण्या,तपासण्या आणि रोग निदान चाचण्या आणि कोणत्याही संसर्गजन्य रोगसाथीत आवश्यक असलेले रुग्णांचे अनुषंगिक विलगीकरण इ. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेद्वारे करण्याचे धोरण नाकारले आहे. त्या ऐवजी राजकीय नेतृत्वाने आपल्या भांडवलदार मित्रांना आरोग्य आणि सार्वजनिक आरोग्यसेवा नफेखोरीसाठी बहाल करण्याचे धोरण घेतले आहे. दरम्यान, या महामारीच्या काळात घाईघाईने,कोणतेही नियोजन न करता लागू करण्यात आलेले लॉकडाऊन अपरिहार्यपणे लांबत गेले. असे लॉकडाऊन परत परत लावावे लागले. परिणामी अर्थव्यवस्था आणखीनच ढासळली. अर्थवृद्धीदर उणे झाला आणि कोट्यावधी सामान्य नागरिकांनी त्यांची वास्तविक जीवनमान गमावले.

घीसाडघाई पद्धतीने लागू केलेले लॉकडाऊन आणि तेवढ्याच घाईघाईने लॉकडाऊन उठवण्याचे नवउदार देशांचे धोरण या मुळे 'अत्यावश्यक गरजेचा' असलेला कामगार कर्मचाऱ्यांचा वर्ग या रोगाच्या साथीत अधिकाधिक विषाणू संपर्कात आला.सरकारच्या चुकीच्या सल्ल्यांमुळे आणि चुकीच्या प्रतिबंधक धोरणामुळे, तसेच अपूऱ्या लसीकरणामुळे कोरोना विषाणू संसर्गाची संख्या आणि मृत्यूचा दर अपरिमीत प्रमाणात वाढला.

काही श्रीमंत देशांनी आपल्या नागरिकांच्या खात्यात आर्थिक मदत जमा केली. या मदतीचा छुपा उद्देश बजारपेठेची मागणी टिकून राहावी हाच होता. आधीच कर्जात बुडालेल्या गरीब देशांना अशी मदत देणे शक्य नव्हते. त्यामुळे या देशांचे सरकार महामारीच्या संकटाला तोंड देण्यास आणखीनच दुबळे ठरले. त्यांना आपल्या नागरिकांच्या मूलभूत गरजाही भागवणे शक्य झाले नाही.

देशादेशात आधी पासून असलेल्या सामाजिक फाटाफुटी आणि समाजासमाजातील दरी आणखीनच रुंद होत गेली.उच्च पगारदार लोक ‘वर्क-फ्रॉम-होम’ करत राहिले. त्यांना घरातून काम करताना पूर्ण पगार मिळत राहिला आणि रोजचे कामही कमी झाले. या गटातील लोकांनी कोरोना काळात आपले कर्जही बऱ्याच प्रमाणात फेडले.तर वित्तीय बाजारपेठेच्या आधाराने त्यांचे तर उखळ पांढरे झाले. त्यामुळे हा पैसेवाला, उच्च अभिजन वर्ग अधिक मालदार झाला आणि त्यांच्यातील अधिकाधिक लोक कोट्याधीश झाले.

कामगार कष्ट्करी वर्गातील लोक, विशेषत: अल्पवेतनावर काम करणाऱ्या स्त्रिया,वांशिक अल्पसंख्य आणि अन्य असुरक्षित सामाजिक गट यांच्यावर मात्र विपरित परिस्थिती ओढवली. त्यांना दारिद्र्य,बेरोजगारी,विलगीकरण,जमापुंजी संपल्यामुळे वाढीव व्याजदाराचे कर्ज घ्यावे लागणे, किंवा ‘अत्यावश्यक’ कामगार आणि ‘ फ्रंटलाईन’ कामगार या नावाखाली अल्पवेतनावर काम करावे लागणे अशा विविध संकटांना तोंड द्यावे लागले. या वर्गातील कामगार कोरोना विषाणू संसर्गाला अधिकाधिक बळी पडले आणि मृत्युमुखी पडले. अपुऱ्या आरोग्य सुविधा,गर्दी, अनेक प्रकारची कामे, अस्वच्छ वस्त्या यामुळे संसर्गाचा धोका आणि मृत्यूचे प्रमाण वाढले. अशा समाजगटातील कामगारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कामगार संघटना त्यांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरल्या. एका बाजुला रोजगाराची संधीच कमी होत होती आणि दुसऱ्याबाजुला काम देणारे मालक किंवा कंत्राटदार संधीसाधूपणा करत होते. कोरोना महामारीच्या काळात सर्वात भरडल्या गेलेल्या या कामगार वर्गाची आणि त्यांच्या हाल अपेष्टांची पुरेशी दखलही घेतली गेली नाही.

बालसंगोपन करणाऱ्या माता आणि स्त्रिया नेहमीच पुरुषांच्या दबावाखाली असतात. त्याच समाजातील मुले,वृद्ध माणसांची देखभाल करत असतात. याशिवाय स्त्रिया अल्पवेतनावरील काम करून घराच्या उत्पन्नाला हातभार लावतात. या महामारीच्या काळात आणि लॉकडाऊनच्या काळात त्यांच्यात्र अतिरिक्त दबाव आला आणि त्या अधिक भरडल्या गेल्या. शाळा आणि

बालसंगोपन गृह बंद झाल्यामुळे ते काम करणाऱ्या अक्षरश: लाखो स्त्रियांचा रोजगार हिरावला गेला आहे. कामगार वर्गातील कुटुंब प्रमुख स्त्री असलेल्या कुटुंबाना महामारीच्या काळात अधिक तीव्र फटका सहन करावा लागला.आरोग्य व्यवस्था कोलमडल्यामुळे स्त्रियांना गर्भनिरोधक साधनांची उपलब्धता बंद झाली. तर दीर्घकालीन लॉकडाऊनमुळे कुटुंबांतर्गत हिंसेचे प्रमाण प्रचंड वाढले.

समाजातील अन्य असंरक्षित, वचिंत समाज गटांनाही करोना महामारीचा मोठा फटका बसला होता. सरकारतर्फे प्रसारित होणारी दिशाभूल करणारी माहिती आणि उजव्या विचारसरणीच्या पक्ष संघटनांनी अल्पसंख्य समाजाला बळीचे बकरे बनवल्यामुळे, उत्तर अमेरिकेतील पूर्व-अशियायी नागरिक आणि भारतातील मुस्लिम अल्पसंख्य समुदायांना, हिंसक घटनांना आणि द्वेषपूर्ण वातावरणाला तोंड द्यावे लागले. समाजातील स्त्रिया आणि लैंगिक अल्पसंख्य समाज गटांना नोकरीं रोजगाराच्या संधी नाकारणे,निवारा आणि आरोग्य सेवा, तसेच अन्य सामाजिक सेवा नाकारण्याचे प्रमाण वाढले.

लादले गेलेले विलगीकरण आणि अर्थपूर्ण सामाजिक संपर्काचा अभाव, शिक्षणातील खंड आणि शैक्षणिक कारकिर्दीचा खेळखंडोबा झाल्यामुळे समाजातील लहान मुले आणि युवा वर्गाला मोठा फटका बसला. खात्रीशीर संगणक, इंटरनेट सेवा आणि वीज पुरवठा उपलब्ध नसलेल्यांचे खूप मोठे नुकसान झाले. अनेक मुलांना शाळा सोडाव्या लागल्या. आधीच अपुऱ्या असलेल्या रोजगाराच्या संधी आणि घसरलेल्या आर्थव्यवस्थेमुळे परत कधी नोकरी मिळेल याची कोणतीच शाश्वती नसलेल्या युवा वर्गाला नैराशाने घेरले.

या दयनीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चीनमधील समाजवादी व्यवस्थेमधील परिस्थिती कित्येक पटींनी उत्तम असल्याचे ठळकपणे पुढे आले. चीनमधील आरोग्य व्यवस्था अत्यंत कार्यक्षम आणि प्रभावी ठरली.एखाद्या विकसनशील देशातील आरोग्य व्यवस्था किती लोकाभिमुख असू शकते याचे ते आदर्श उदाहरण म्हणता यईल. चीनच्या आरोग्य खात्याने सर्वाधिक प्राधान्य रुग्णांचे जीव वाचवण्यासाठी दिले.त्यांनी अक्षरश: काही दिवसांत सुसज्ज रुग्णालये उभी केली. सर्व देशातील आरोग्य कर्मचाऱ्यांना वेगाने वुहान येथे आणण्यात आले.चीनने प्रथम विषाणू संसर्ग नियंत्रणात आणला आणि रुग्णांचे जीव वाचवले. त्यापाठोपाठ आपली अर्थव्यवस्था तातडीने

पूर्वपदावर आणली.आज परत एकदा चीनी अर्थव्यवस्था जगातील एक सर्वात आघाडीची अर्थव्यवस्था बनली आहे.

अन्य समाजवादी देशातील कोविड हाताळणीचे अनुभवही अशाच प्रकारचे आहेत. 6 ऑगस्ट, 2021 च्या आकडेवारीनुसार चीनमधील कोविड मृत्युदर प्रती दहालाख लोकसंख्येमागे 3.22 इतका कमी होता तर व्हिएतनाम, लाओस(जगातील सर्वाधिक बॉम्ब हल्ले झालेला देश), क्युबा, व्हेनेझुएला आणि निकारगोआ या देशातील प्रति दहालाख रुग्णांमागे मृत्यू दर अनुक्रमे 27.94, 0.96, 281.11, 128.92 आणि 29.59 इतका होता. तुलनेत अमेरिका, कॅनडा इंग्लंड आणि फ्रान्स यां देशातील प्रति दहा लाख कोरोना रुग्णांमागे मृत्यू दर अनुक्रमे 1858.96, 1920.72, 704.81 आणि 704.81 इतका होता. पूर्व अशियायी भांडवली अर्थव्यवस्थांनीसुद्धा महामारीची आपत्ती चांगल्या पद्धतीने हाताळली होती. पूर्व अशियातील देशात पारंपरिक शासन पद्धतीत सरकारी (शासकीय) हस्तक्षेप आणि सरकार मार्फत पुढाकर याला महत्त्व आहे. सामाजिक व्यवहाराशी निगडित ही ‘कन्फ्युशियन’ विचारप्रणालीशी संबंधित तत्त्वे आहेत.त्यामुळेच कोविड महामारीच्या समस्येला या देशांनी अधिक चांगल्या रितीने तोंड दिले. या देशांपैकी जपान आणि दक्षिण कोरिया या दोन देशातील कोविड मृत्यूदर अनुक्रमे प्रति दशलक्ष 120.61 आणि 41.21 इतका होता.

भांडवलशाही देशांनी आणि त्यांच्या प्रसारमाध्यमांनी मात्र समाजवादी व्यवस्थांनी कोविड महामारीवर मात करण्यात मिळवलेल्या यशाला महत्त्व द्यायचे नाही, असे धोरण कटाक्षाने पाळले. अगदी *लॅन्सेट* सारख्या प्रतिष्ठित वैद्यकिय नियतकालिकानेही आपल्या मांडणीत कोविड महामारी यशिस्वीरित्या रोखण्यापेक्षा संसर्ग प्रसार दाबून ठेवण्यात मिळवलेल्या यशाला महत्त्व दिले. त्यातही आपला अभ्यास ओइसीडी देशांमधील कोविड हातळणी अनुभवापुरता मर्यादित ठेवला.या अभ्यासातून कोविड महामारी यशस्वीरित्या रोखण्यात समाजवादी व्यवस्थांनी वापरलेल्या प्रारुपावरील चर्चा वगळली होती.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करणे आणि विषाणू संसर्ग रोखण्यासाठी आवश्य मानवी कौशल्य विकास करण्यासाठी आवश्यक आर्थिक गुंतवणूक करण्याबाबत अत्यंत उदासीन असलेल्या नवउदार भांडवली देश, बड्या औषध कंपन्यांच्या नफेखोरीला प्रोत्साहन देणाऱ्या लस निर्मिती आणि लसीकरणाला सर्वाधिक महत्त्व देत राहिले. कोणत्याही महामारीला तोंड देण्यासाठी

लस आणि लसीकरण नक्कीच महत्त्वाचे असते, मात्र  तेवढेच पुरेसे नसते. सामाजिक पातळीवर जनतेच्या सहभागाने रोग निदान चाचणी, रोग प्रसाराचा मागोवा आणि आवश्यक तेव्हा योग्य प्रकारची रुग्ण विलगीकरण व्यवस्था हे घटक तितकेच महत्त्वाचे असतात. या उलट शासकीय व्यवस्थेबद्दल संशय असलेल्या देशात लोकांमध्ये लसीकरणाला पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे लसीकरणाचे प्रमाण अपेक्षित पातळीपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे अनेक श्रीमंत देशात आणि तिसऱ्या जगातील देशातील फार मोठी लोकसंख्या लसीकरणापासून वंचित राहिली आणि रोगापासून असंरक्षित राहिली. परिणामी विषाणूचे नवनवे अवतार प्रगट होत राहिले आणि पसरत राहिले.

या नवउदार भांडवली शासनांनी लसीकरणाबाबतचे भेदभावाचे धोरण काळजीपूर्वक वापरल्याचे दिसते.श्रीमंत देशांनी आधीच तुटवडा असलेल्या लसींची घाऊक खरेदी करून लस पुरवठा सतत अपुरा राहील याची खबरदारी घेतली. त्याचवेळी मोठ्या औषध कंपन्यांच्या लसींच्या संशोधनावरील ‘बौद्धिक संपदा हक्कां’चा आग्रह धरत अनेक देशांना लसींची निर्मिती करण्यापासून प्रतिबंधित ठेवले. तर चीन आणि रशियाने परवडण्याजोग्या किंमतीत आणि काही प्रमाणात मानवतावादी धोरण म्हणून दान स्वरुपात कोरोना लसींचा पुरवठा करण्यास सुरवात केली, तेव्हा पाश्चिमात्यांनी चीन,रशियाच्या या धोरणावर हे ‘लसींचे राजकारण’ (vaccine Diplomacy) आहे,अशी ओरड सुरू केली. त्याच बरोबर लसींची गरज असलेल्या गरीब देशांना चीन,रशियाकडून लसी स्वीकारु नयेत असाही प्रचार केला.

विषाणुंचे भिन्न प्रकार उद्भवले तेव्हा त्यावरील उपाय म्हणून लसींचा ‘बूस्टर डोस’ देणे गरजेचे ठरवले गेले. त्यामुळे मोठ्या औषध कंपन्यांना अधिक नफा मिळवण्याची संधी मिळेल, असे डावपेच आखण्यात आले. त्यासाठी भांडवली देशात स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवर लॉकडाऊन लागू करायचे आणि अधूनमधून उठवायचे असे चक्र चालू ठेवण्याचे धोरण घेतले गेले. याचा थेट परिणाम म्हणजे कामगार वर्गाचा रोजगार हिरावला गेला आणि त्याच बरोबर एक दीर्घकालिन अनिश्चितता, विषमता, निराशा आणि वाढते मृत्यू असे चक्र सुरूच राहिले.

कोविड महामारीच्या परिस्थितीत सुधारणा झाली, तरी ती अगदी थोडी व्हावी आणि इंग्रजी के-आकाराच्या आलेखात असेल याची काळजी घेतली गेली. त्यामुळे अतिश्रीमंत छोटा उच्चभ्रू गट आणि उर्वरित गरीब लोकांमधील विषमता तीव्र होईल.

**समाजवादासाठी वर्गलढे आणि राष्ट्रीय लढे**

समाजवादी व्यवस्थांनी मिळवलेले यश आणि भांडवलशाहीचे अपयश यातील तफावत इतकी ठळक दिसत आहे, की त्यामुळे भांडवलशाहीचे भविष्य आंतरराष्ट्रीय सत्ता समतोलाच्या संदर्भात डळमळीत झाले आहे. नजिकच्या भविष्यात समाजवादाकडे होणाऱ्या वाटचालीत वर्ग लढ्यांना जेव्हढे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व आंतरराष्ट्रीय संघर्षालाही आहे.

सध्या साम्राज्यवादी भांडवलशाहीचे समर्थक नवउदारवादाच्या एका नव्या टप्प्याकडे जाण्याच्या तयारीत आहेत. हा टप्पा म्हणजे भ्रामक-परोपकारी टप्पा. या टप्प्यात सामान्य आम माणसांना आणि गरीब देशांना माणुसकीच्या दृष्टिकोनातून मूलभूत गरजेच्या वस्तू, पर्यावरणपूरक किंवा औषध निर्मितीसंबंधी तंत्रज्ञान किंवा शिक्षण आणि आरोग्य सेवा पुरवायच्या. याला पार्श्वभूमी आहे ती महामारीमुळे जगभरातील बाजारपेठेत घसरलेली मागणीची. अशा परिस्थितीत गरीब देश अत्यंत सोयिस्कार ग्राहक ठरतात. यासाठी काही उत्पादने आणि सेवा मिळणे हा नागरिकांचा ‘मूलभूत हक्क’ आहे असे ‘सोयीचे तत्वज्ञान’ सध्या तयार केले जात आहे. यातून काही उत्पादने आणि सेवांची मागणी जगभरात निर्माण केली जात आहे. त्यामुळे आपोआपच अशी उत्पादने आणि सेवा पुरविण्यासाठी शासनाचा क्रियाशील आर्थिक सहभाग वाढेल. अशा पद्धतीने ‘जीवनावश्यक’ ठरवण्यात आलेली कॉर्पोरेट खासगी उत्पादने सरकारमार्फत खरेदी करण्याचे समर्थन करण्यासाठी ही खासगी क्षेत्राची ‘अभिनव दूरदृष्टी’, ‘वैशिष्ट्यपूर्ण धोरण’ आणि कॉर्पोरेट क्षेत्राच्या ‘कार्यक्षमतेचे उदाहरण आहे’, असे युक्तिवाद प्रचारात आणले जातील. प्रत्यक्षात मात्र सरकारी कर महसुलातून खासगी क्षेत्रातील अतिशय अकार्यक्षम, अपूऱ्या आणि दुय्यम दर्जाच्या सेवा आणि उत्पादनांसाठी पैसे मोजले जातील. अशा व्यवहारांच्या आडून आर्थिक सट्टेबाजी आणि व्याज आकारणीचे खेळ अखंडपणे चालू ठेवले जातील.

अर्थात या नव्या अवतारातल्या नवउदारवादी अर्थव्यवस्थांना नक्कीच जनतेच्या असंतोषाला तोंड द्यावे लागणार आहे. या असंतोषाचे महत्त्वाचे कारण, म्हणजे वाढत जाणारी विषमता आणि भांडवलशाहीची घसरत जाणारी उत्पादकता. आज संघटित आणि धूर्त डावी राजकीय शक्ती कार्यरत नसतानाही वारंवार उघड होत राहणारे आणि राजकीय क्षेत्राला हदरवणारे आर्थिक घोटाळे आणि भ्रष्टाचाराची उदाहरणे भांडवलशाहीचे अपयश दाखवून देत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर, नवउदार भांडवलशाहीचे अशा प्रकारचे व्यवहार आणि राजकीय तत्वज्ञान साम्राज्यवादी

भांडवलशाही गाभ्यातील देश वगळता अन्य देशांच्या गळी उतरणे अवघड आहे. कारण,आपल्या जनतेला उत्तरदायी असलेली देश पर्यायी व्यापार आणि गुंतवणुकीचे मार्ग शोधणार. त्यातील मुख्य पर्याय म्हणजे चीन असणार आहे.

आज खरोखरच ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील बहुध्रुवियता वाढत आहे, साम्राज्यशाही ताकद आणि डॉलरचा वरचष्मा कमी होत आहे. भांडवलशाही व्यवस्थेत वेगाने दोष आणि विसंगती निर्माण होत आहेत. चीन बरोबर नव्याने शीतयुद्ध सुरू झाल्याचा प्रचारी डंका दिवसेंदिवस निष्प्रभ ठरत आहे. साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यात आता तीव्र फाटाफूट होऊ लागली आहे. उदाहरणार्थ, नॅटो सदस्य राष्ट्रांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय भांडवदार वर्गात फूट पडायला सुरवात झाली आहे. तर,दुसऱ्या बाजुला जगातील अनेक राष्ट्रांमध्ये चीन विषयी आकर्षण वाढत जात आहे.अगदी पाश्चिमात्य भांडवलशाही देशांच्या आघाडीतील देश आणि कार्पोरेट कंपन्यांनासुद्धा चीनच्या अर्थव्यवस्थेविषयी आकर्षण वाटते. अमेरिका चीनच्या वाढत्या प्रभावाला तोंड देण्यासाठी युरोपियन, पूर्व आणि दक्षिण अशियायी आणि अँटिपोडियन (न्युझिलंड आणि ऑस्ट्रेलिया) या क्षेत्रातील आपले 'लोकशाहीवादी' मित्रदेश यांना एकत्रित करून 'इंडो-पॅसिफिक क्वाड्रिलॅटरल' [यात ऑस्ट्रेलिया,भारत, जपान आणि अमेरिका या देशांचा समावेश आहे] अशी डावपेचात्मक आघाडी निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे.

अमेरिका पुरस्कृत वैश्विक मूल्यांवर आधारित 'नियमबद्ध आंतरराष्ट्रीय व्यवस्था' तयार व्हावी असा अमेरिकेचा प्रस्ताव आहे. परंतु, त्या प्रस्तावातील मूल्यांमधील पोकळपणा आताच उघडा पडत अहे. उदाहरणार्थ, अमेरिकेच्या प्रस्तावित नियमावलीत, तिसऱ्या जगातील देशांवर आवश्यक असेल तर लष्करी आक्रमकता,व्यापारी प्रतिबंध,दंड लावणे असे नियम लागू करण्याचा प्रस्ताव आहे. याचाच अर्थ तिसऱ्या जगातील देशांना, साम्राज्यवादी देशांच्या भूमिकेशी सुसंगत स्वत:च्या विकासाचा हक्क नाकारण्यात आला आहे.या तुलनेत चीनने 'आंतरराष्ट्रीय कम्युनिटी' विषयी दिलेला प्रस्ताव कित्येक पटीने चांगला आणि आकर्षक आहे. ' कम्युनिटी विथ अ शेअर्ड फ्युचर फॉर ह्युमनकाइंड' अशा शीर्षकाने मा6डण्यात आलेला हा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र संघात मान्य झालेली समान मूल्ये, संयुक्त राष्ट्र संघाची मूलभूत तत्वे आणि शांततामय सहास्तित्वासाठी मान्य झालेली पाच तत्त्वे(पंचसूत्री) यावर आधारित आहे. या प्रस्तावाचा विचार केला तर लक्षात येते, की या प्रस्तावाच्या आधारे सर्व मानवतेसमोरचे समान प्रश्न (आणि आव्हाने) सोडवणे शक्य आहे.

आज भांडवलशाही स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर एका वळणावर उभी आहे.या पार्श्वभूमीवर समाजवादाकडे आगेकुच करु इच्छिणाऱ्या वर्गांनी (जनसमुहांनी) आणि राष्ट्रांनी एकजुटीने वाटचाल करणे आवश्यक आहे. या वाटचालीत इराण किंवा येमेनच्या अन्सारुल्लाह यांच्यासारख्या काही सरकारे आणि चळवळींना आपले दोस्त म्हणून सहभागी करुन घ्यावे लागेल. कदाचित अशा घटकांना सहभागी करून घेणे कामगार वर्गाला, समाजवादी राष्ट्रांना आणि डाव्या चळवळींना विचित्र वाटू शकते. मात्र, आजच्या घडीला या घटकांना साम्राज्यवादी आक्रमकतेला, युद्ध, आर्थिक प्रतिबंध आणि आर्थिक दंड, तसेच वर्णद्वेष आणि जबरदस्ती सरकार बदल अशा दडपणुकीला तोंड द्यावे लागत आहे.म्हणूनच या घटकांनाही व्यापक साम्राज्यवाद विरोधी एकजुटीत सहभागी करून घेण्याची गरज आहे.

**समाजवाद आज हवा ! -– लोकांची आणि जनसमुहांची मागणी.**

भांडवलशाही ही एक प्रगतिशील व्यवस्था आहे, असे स्वरुप भांडवलशाहीने फार पूर्वीच गमावले आहे. जग आज नव्या औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर आहे. या औद्योगिक क्रांतीत रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटीलिजन्स, नॅनोटेक्नॉलॉजी, क्वांटम कॉम्प्युटिंग, बायोटेक्नॉलॉजी, इंटरनेट ऑफ थिंग्ज, थ्री-डि प्रिंटिंग, अशी अनेक नवी अत्याधुनिक उत्पादने तयार झाली आहेत.या उत्पादनांच्या सामाजिकीकरणला भांडवलशाहीच्या नियंत्रणाखालून बाहेर काढण्याचे मोठे आव्हान आज समस्त मानवजातीसमोर आहे.या उत्पादनांच्या संपूर्ण क्षमता भांडवलशाही विकसित करु शकणार नाही. या उत्पादनांच्या क्षमता पूर्णांशाने विकसित करण्याबाबत चीन खूप अग्रेसर आहे.या उत्पादनांच्या प्रमाणीकरणावर नियंत्रण, त्या संबंधी बौद्धिक संपदा अधिकार आणि त्यानुसार भांडवली जगाकडून किती भाडे आकारण्याची पद्धत काय असावी, याबाबत चीनने खूप प्रगती केली आहे. अमेरिकेच्या संरक्षण खात्याच्या या तंत्रज्ञानवरील प्रभुत्वाला आव्हान देण्याची क्षमता आज चीनकडे आहे.

आज जगातील अनेक ठिकाणचे लोक समाजवाद उभारणीच्या प्रयत्नात  उतरले आहेत.परंतु, अनेक ठिकाणचे डावे पक्ष आजच्या ऱ्हास पावणाऱ्या आणि लुटारु भांडवलशाही नियंत्रणाशी संघर्ष करत आहेत. आता वेळ आली आहे की जगातील सर्व कामगार वर्गाने 'एक वर्ग' म्हणून उभे राहिले पाहिजे आणि भांडवलदार वर्गाची सत्ता उलथून टाकली पाहिजे आणि राजकीय नियंत्रण आपल्या ताब्यात घ्यायला पाहिजे.

आपण कम्युनिस्ट समाज नक्कीच निर्माण करु शकू. असा समाज जिथे उत्पादित वस्तुंच्या विनिमय मूल्यापेक्षा उपयुक्ततेला महत्त्व अधिक दिले जाईल.उत्पादनांचे सामाजिक वितरण ‘एखाद्याच्या (खरेदी) क्षमतेपेक्षा,प्रत्येकाच्या गरजेनुसार केले जाईल’. अर्थात असा समाज निर्माण होण्यासाठी आपल्याला खूप दीर्घ संघर्ष करावा लागणार आहे. त्या आधी समाजवादाला अनेक टप्प्यातून जावे लागणार आहे --- उत्पादन, वितरण व्यवस्था आणि उत्पादनांचे स्वरुप यांचे वाढत्या प्रमाणात सामाजिकीकरण करावे लागेल. आपल्या समाजाची उत्पादन क्षमता विकसित करण्यापूर्वी आपल्या समाजात आणि संस्कृतीमध्ये माणसामाणसात दुसऱ्या माणसांबद्दल, एक दुसरा गट आणि समुहाविषयी एकजुटीची भावना निर्माण व्हावी लागेल. एक दुसऱ्याशी प्रेमाचे नाते जोडण्याची क्षमता निर्माण व्हावी लागेल. या पृथ्वीवर सर्व माणसे आणि प्रजातींसह सामंजस्य आणि शांततापूर्ण नाते स्थापित करावे लागेल.

हे साध्य करत असतानाच आपल्याला आज शासनावर असलेले भांडवलदारांचे नियंत्रण आपल्या ताब्यात घ्यावे लागेल. शासनावरील सार्वजनिक नियंत्रण अत्यावश्यक आणि निर्णायक महत्त्व आहे. कामगार वर्गाने हे नियंत्रण आपल्या हातात घ्यायला हवे.समाजवादाच्या आरंभीच्या टप्प्यावर अनेक उद्योगात खाजगी भांडवल कार्यरत असेल. मात्र समाजवादी व्यवस्थेत हळूहळू योग्य नियोजन करत आणि व्यापक समाजहिताचा विचार करुन सर्व उत्पादन सार्वजनिक नियंत्रणाखाली आणावे लागेल. एखाद्या अत्पादन पद्धतीचे सामाजिकीकरण करावे अथवा नाही हा निर्णय त्यात्या संदर्भात आणि बरेचदा व्यावहारिक घटकांचा विचार करून घ्यावा लागेल.

प्रत्येक देशाची या समाजवादाच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीची गती आणि पद्धत, त्या त्या देशातील स्थानिक उत्पादन व्यवस्थेचा विकास,सामाजिक रचना आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी यानुसार ठरत जाईल. काही देशात हा प्रवास थोडा उशिरा सुरु होईल, काही देशात जाणीवपूर्वक थोडा लांबचा मार्ग स्वीकारला जाईल. तर काही थोड्या देशात कदाचित हा प्रवास ताबदतोब सुरू होऊ शकतो, अशी स्थिती आहे.

या समाजवादाकडे जाणाऱ्या संघर्षातील सर्वात महत्त्वाचे तत्व कोणते असेल तर,‘नफेखोरीपेक्षा ही पृथ्वी आणि त्यावरील माणसं आहेत’. म्हणूनच समाजवादासाठी संघर्ष करणाऱ्या जनतेच्या आणि लोकांच्या समुहांच्या मागण्या पुढील प्रमाणे असतील. :

1. महामारीमुळे लोकांना सहन कराव्या लागलेल्या शारीरिक, आर्थिक आणि भावनिक वेदनांनी एक महत्त्वाची गोष्ट पुढे आणली आहे, ती म्हणजे संपूर्ण आरोग्यव्यवस्थेचे सामाजिकीकरण करणे आवश्यक आहे. सर्व नागरिकांना आरोग्याचा मोफत हक्क आणि अधिकार मिळायला हवा. समाजवादी व्यवस्थेकडे जाण्यासाठी ही मागणी कळीची ठरणार आहे. या आरोग्याच्या सामाजिकीकरण व्यवस्थेत सामाजिक(वस्ती) पातळीवरील सार्वजनिक आरोग्यव्यवस्था निर्माण केली जावी. अशी व्यवस्था सर्वदूर जिल्हा आणि गाव पातळीवर कार्यरत व्हावी. या व्यवस्थेद्वारे भविष्यातील साथीचे रोग प्रतिबंधक आणि रोग निवारक सर्वोत्तम उपचार मिळतील अशी व्यवस्था असावी. अशा प्रकारची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था निर्माण करणे श्रीमंत वा गरीब अशा सर्व देशात शक्य आहे. अशा आरोग्य व्यवस्थेमुळे आणखी दोन फायदे होतील. या व्यवस्थेसाठी कुशल वैद्यकीय व्यावसायिकांची मागणी वाढेल आणि परिणामी सार्वजनिक शिक्षणाला चालना मिळेल, तसेच या व्यवस्थेला पूरक प्रशिक्षण आणि रोग प्रतिबंध आणि रोग निवारक संशोधन सुरू होईल. समाजवादी समाजव्यवस्था प्रत्यक्षात येण्यासाठी जनतेला उत्तरदायित्व असलेल्या कल्याणकारी प्राधिकारी असलेली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था तयार होणे, हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.अशी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था पूर्णांशाने नाही, तरी बऱ्याच प्रमाणात प्रत्यक्षात आणणे शक्य झाले, तरी लोकांना अशा मागणीचे महत्त्व लक्षात येऊन,समाजवादाच्या दिशेने जाण्यासाठी अशाच प्रकारची व्यवस्था शिक्षण, बाल संगोपन, वृद्ध नागरिकांचे सर्वांगीण संगोपन आणि निवारा, गृहनिर्माण अशा सामजिक क्षेत्रात निर्माण करण्यासाठी लोक मागणी करु लागतील.

2. समाजवादाकडे आगेकूच करताना आपल्याला मार्क्सने ठामपणे मांडलेले एक सत्य लक्षात ठेवावे लागेल ते म्हणजे : कोणत्याही उत्पादन व्यवस्थेतील दोन मुख्य घटक म्हणजे मानवी श्रम आणि जमीन - हे घटक क्रयवस्तू नाहीत किंवा समाज निर्मितीचे मुख्य साधन पैसा ही सुद्धा ‘क्रयवस्तु’ नाही.  भांडवलशाही जमीन आणि श्रम या घटकांना क्रयवस्तुचे रुप देते. पैसा या समाज निर्मितीच्या घटकालाही क्रयवस्तुचे रुप देते. त्यामुळे भांडवलशाही विसंगतीच्या गुंत्यात अडकते – सामाजिक श्रमांतून निर्माण होणारे सर्व लाभ खासगी लाभ म्हणून लूटले जातात, पर्यावरण उध्वस्तीकरण आणि शेती क्षेत्राची दुरावस्था होत जाते. समाजातील शेतकरी या मूलभूत उत्पादक घटकाची अवस्था दयनीय होत जाते. पैसा हे समाजनिर्मितीचे साधनच

क्रयवस्तु ठरवल्यामुळे पैशाचे गैरव्यवस्थापन, घोटाळे आणि आर्थिक आरिष्ट सतत तयार होतात.

जमीन,श्रम आणि पैशाला आलेले आजचे क्रयवस्तुचे स्वरुप नष्ट (Decomodifying) केले गेले तर समाजवादाकडे जाणारे ते महत्त्वाचे पाऊल ठरेल.

पर्यावरणीय आणीबाणीच्या परिस्थितीबाबत तयार झालेली निकड तातडीने हाताळावी लागणार आहे,यात शंका नाही.पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होऊ नये यासाठी आपल्याला जमीन आणि जलस्रोत सार्वजनिक मालकीखाली आणावे लागतील. तरच पर्यावरण संकटाचा मुकाबला करण्यासाठी योग्य कृती आराखडा तयार करता यईल आणि वास्तवात आंमलात आणता यईल. असा आराखडा तयार करताना व्यापक जनसहभाग असणे आवश्यक असेल. तसेच तो आंमलात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात सरकारी आर्थिक गुंतवणूक असेल. त्याचवेळी भूगर्भातील इंधन वापर कमी करत पुनर्निमितीक्षम आणि शून्य कार्बन उत्सर्जन करणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व्यापक प्रमाणात निर्माण करावी लागणार आहे. जैव विविधता संवर्धन,वनीकरण आणि अन्न प्रणालीची नवी रचना निर्माण करणे, अशी धोरणे आंमलात आणावी लागेल.या नव्या धोरणात समन्यायी पद्धतीने आणि वैज्ञानिक पायावर आखणी करून सर्व नागरिकांना घरांचे वाटप केले जाईल. विविध उत्पादनांच्या आणि आर्थिक व्यवहारांच्या गरजेनुसार जमिनींचे वाटप केले जाईल.

सर्वांना रोजगाराचा हक्क आणि सर्व सक्षम माणसांना योग्य वेतनमान आणि काम करू न शकणाऱ्या माणसांना आवश्यक आर्थिक मदत, असे धोरण असेल. सर्व प्रकारच्या उत्पादनांच्या वाढीमुळे समाजात त्या मुबलकपणाने उपलब्ध असतील, त्यामुळे कामाच्या वेळेत घट करण्यात येईल. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपली व्यक्तिगत कौशल्ये वाढविण्याची संधी मिळेल, आपल्या आवडीच्या सृजनशील कामासाठी वेळ देता यईल. विज्ञान, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात अभूतपूर्व अशी नवी उंची गाठण्याची शक्यता निर्माण होईल.

आपल्याला पैसा आणि बँकिंग प्रणालीचे राष्ट्रीयकरण करावे लागेल. त्यामुळे या दोन्हीचा उपयोग उत्पादन आणि वितरण व्यवस्था सुसंघटित करण्यासाठी केला जाऊ शकेल.

अलीकडच्या काळात साम्राज्यशाही देशांनी जमीन,श्रम आणि पैसा या बरोबरच ज्ञान आणि तंत्रज्ञानाचेही बौद्धिक संपदा हक्कांच्या माध्यमांतून क्रयवस्तुत रुपांतर केले आहे. वास्तविक निसर्ग आणि संस्कृती प्रमाणेच ज्ञान आणि तंत्रज्ञान हे सुद्धा मानवाच्या सामायिक वारशाचा भाग आहे.त्यामुळे ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे क्रयवस्तुत करण्यात आलेले रुपांतर बदलून आपल्याला ते मानवी समाजाच्या सामायिक मालकीचे करावे लागेल. ज्ञान,तंत्रज्ञान म्हणजे वास्तविक निसर्गाचेच दुसरे रुप आहे. आपल्याला शिक्षण आणि संशोधन सार्वजनिकरित्या खुले करायला हवे आणि ज्ञान प्रवाह मुक्त वाहू दिला पाहिजे.

3. समाजवादी व्यवस्थेच्या वाटचालीतील पुढचे महत्त्वाचे तत्त्व मक्तेदारीसंबंधी योग्य धोरण ठरवणे.नैसर्गिक संसाधनांचे उत्खनन, वाहतूक व्यवस्था, तसेच या खनिजांचे समाजाच्या आवश्यक वापरासाठी पूर्ण क्षमतेने उत्खनन करण्यासंबंधी दूरस्थ नियंत्रण करू शकणाऱ्या डिजीटल स्थानकांशी संबंधित तंत्रज्ञान यावरील खासगी मालकी या संसाधनांचे आवश्यक उत्खनन करण्यात अडथळे निर्माण करते. त्यामुळे त्यावरील खाजगी मालकी आणि मक्तेदारी नष्ट करावी लागेल. जीवनावश्यक असणाऱ्या अन्न, जीवनावश्यक उत्पादने, शिक्षण किंवा आरोग्य सेवा इ.बाबत कडक नियंत्रण लागू करुन आवश्यक त्या सेवा आणि उत्पादनांचे राष्ट्रीयकरण करावे लागेल.

ज्या ठिकाणी सार्वजनिक वितरण आणि सार्वजनिक मालकी यासाठीचे वर्ग लढे आणि आंतरराष्ट्रीय संघर्ष या आधीच पुढे गेले आहेत, अशा भागात समाजवादी व्यवस्थेकडे होणारी वाटचाल अधिक सुलभ होत जाईल. अर्थात आपल्याला त्या समाजातील वर्ग भेद, पितृसत्ताकता आणि वांशिक गैरधारणा अशा प्रगतीच्या प्रवासातील अडथळे दूर करावे लागतील. अशा समाजात आपल्याला केवळ औपचारिक पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्षात जीवनमूल्यांच्या पातळीवर लोकशाही जीवन पद्धती रुजवण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील.

4. समाजाच्या वास्तविक गरजा कोणत्या आणि भांडवलशाही बाजारपेठेच्या गरजेपोटी ग्राहकांत निर्माण केलेल्या 'आभासी कृत्रिम उपभोगी गरजा' कोणत्या याचा अभ्यास करून आणि सखोल चर्चा-विचार करून त्यात नेमका फरक करणे आवश्यक आहे. भांडवलशाही बाजारपेठ वाढवण्यासाठी ग्राहकांत अशा कृत्रिम गरजा जाणीवपूर्वक निर्माण केल्या जातात. उपभोगाच्या आभासी गरजा अशा पद्दतीने उत्पन्न केल्या जातात की गाहकांनी कितीही वस्तू आणि उपभोगाची साधने खरेदी केली तरी त्यांचे समाधान होत नाही,उलट समाजात अतिशय

नियोजनपूर्वक एक सततची अतृप्ती आणि हाव निर्माण केली जाते. परिणामी पर्यावरणीय विनाशाला आपोआप प्रोत्साहन मिळते. यावरील उपाय म्हणजे सर्व प्रकारच्या उधळपट्टीकारक प्रक्रिया आणि वस्तुंचे उत्पादन पूर्णपणे बंद करायला लागेल, उदाहरणार्थ, मूलभूत संरक्षणासाठी आवश्यक असतील तितकी शस्त्रास्त्रे वगळून अनावश्यक शस्त्रांस्त्रांचे उत्पादन बंद करावे लागेल. भांडवली व्यवहारातील वित्तीय सट्टेबाजी बंद करावी लागेल.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पोषक आंतरराष्ट्रीय वातावरण आवश्यक असेल.

5. आपण अमेरिका पुरस्कृत साम्राज्यवादी नव शीतयुद्धाला विरोध करणे आवश्यक आहे. सर्व देशांना आर्थिक राजकीय,वांशिक आणि धार्मिक अशा सर्व प्रकारच्या समानता आणि विकाससाठी पोषक ठरेल अशा बहूराष्ट्रीय प्रशासन व्यवहाराला प्रोत्साहनकारक आंतरराष्ट्रीय संबंधांचा पुरस्कार करायला हवा. अशा संबंधाच्या आधारे आर्थिक,राजकीय,वित्तीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक सहकार्यातून सर्वांचे हितसंबंध जपले जातील आणि सर्व मानवजातीसमोरील आव्हानांना तोंड देता यईल. तिसऱ्या जगातील देशांचा खरा विकास साधायचा असेल तर मानवी क्षमतांच्या विकासासाठी आर्थिक गुंतवणूक आणि या पृथ्वीवरील सर्व माणसांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या नव्या विज्ञान-तंत्रज्ञानाधारित क्रांतीची आवश्यकता आहे. त्यासाठी सर्व अर्थव्यवस्थांचे एकात्मिकरण करून औद्योगिक उत्पादन,त्यासंबंधी विदा आणि उपलब्ध मानवी संसाधन आणि त्यातील शाश्वत संबंध यांना पोषक ठरेल अशा हरित पायाभूत व्यवस्थेकडे वाटचाल करावी लागेल. त्यातून मिळणारे लाभ व्यापक पातळीवर सर्व माणसांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

6. साम्राज्यवादी देशांनी त्यांचे वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी गेली काही शतके एक भ्रामक आणि दांभिक एकात्मिकविश्ववाद उभा केला आहे. साम्राज्यवादाने उभ्या केलेल्या या भ्रामक कल्पनेला आव्हान द्यावे लागणार आहे. असुरक्षितता, अविश्वास,अनादर,युद्ध,असमान विकास, सर्व प्रकारची वाढती विषमता, या आजच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सर्वांना मान्य असलेल्या समान तत्त्व आणि मूल्यांवर आधारित एक नवी कल्पना मांडावी लागेल. जमीन,शेती, सर्व प्रकारचे जलस्रोत,समुद्र आणि हवा या नैसर्गिक घटकांची होणारी हानी रोखणे आणि मानवी जीवन सुरक्षित राखणे हे मोठे आव्हान आहे. या नैसर्गिक घटकांच्या विनाशामुळे पर्यावरणीय आरोग्य, दुर्बळ आरोग्य व्यवस्था, अपूरे आणि अकार्यक्षम आपत्ती व्यवस्थापन आणि बेसुमार कर्जाचा बोझा अशी संकटांची मालिका निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आंतराष्ट्रीय प्रशासन व्यवहारात

बाढत्या बहुध्रुविय संबंधांकडे वस्तुनिष्ठ पद्धतीने बघीतले पाहिजे.यासाठी संयुक्त राष्ट्र संघाची मूळ सनद आणि अलिप्ततावाद चळवळीने पुरस्कृत केलेली शांततामय सहाअस्तित्वाची तत्त्वे ही पायाभूत मार्गदर्शक तत्त्वे म्हणून योग्य ठरतील.त्या आधारे अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांच्या वर्चस्ववादी भूमिकेला शह देणाऱ्या पर्यायी संस्थांची उभारणी करता यईल.

आपल्या जगाची विविधता आणि सांस्कृतिक सभ्यता ही आपली फार मोठी संपत्ती आहे. समानता,परस्पर आदर आणि विश्वास या मूल्यांच्या आधारेच त्या संपत्तीचे आपण संरक्षण आणि संवर्धन करू शकू.शांतता,विकास,समानता,न्याय,लोकशाही आणि स्वातंत्र्य ही अखील मानवजातीची समान मूल्ये आहेत. सर्व मानवजातीसाठी एकच एक असे राजकीय प्रारुप नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्या ऐवजी सर्व जगाने सतत परस्पर विचार विनिमय करुन त्यातून नवीन ज्ञान आणि अनुभव वाटून घेणे आवश्यक आहे. मानवी प्रगतीपासून मिळणारे सर्व लाभ एकमेकांत वाटून घ्यायला हवेत.

**जगातील सर्व कामगारांनो, दडपलेल्या जनसमुहांनो आणि राष्ट्रांनो, एक व्हा !**

---

**मराठी रुपांतर : प्रमोद मुजुमदार**